# प्रकरण तीन

## महिला व बालकल्याण विभाग

**3.849 कुपोषित मुलांना अतिरिक्त आहार खजुर (सिडलेस) पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत महिला व बाल विकास विभागाने कुपोषित मुलांना अतिरिक्त आहार खजुर (सिडलेस) पुरविणेकरिता एकूण रक्कम रुपये 99,99,900/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उद्योग, ऊर्जा विभागाकडील शासन निर्णय, दिनांक 02/01/1992 चे "परिशिष्ट सात" मध्ये नमुद केल्याप्रमाणे खरेदी समितीच्या इतिवृत्तात बाजारातील दुकानदारांचे बाजारभाव तीन दर नमुद केले आहे. दिनांक 10/06/2014 ला प्राप्त झालेले दर हे बाजारभावाप्रमाणे असल्याबाबत स्पष्ट होत नाही.

2) सन 2014-15 मध्ये खरेदी समितीच्या मान्यतेने पुर्नप्रत्ययी आदेश जा.क्र.ठाजिप/एबाविसेयो/ आस्था-1/521/14-15,दिनांक 31/07/2014 अन्वये 48,780 किलो खजुर (सिडलेस) साठी 205 प्रती किलो दर देतांना खरेदी समितीची बैठक कोणत्या दिनांकास झाली ते संचिकेत पाहावयास मिळाले नाही, संचिकेत फक्त इतिवृत्त आहे. त्यावर दिनांक नमुद नाही.

3) करारनाम्यातील अटी व शर्ती क्रमांक 3 अन्वये खजुर (सीडलेस) पुरवठा चार टप्प्यात करण्यात येईल (1) दिनांक 25/08/2014 पुर्वी (2) दिनांक 25/09/2014 पुर्वी (3) दिनांक 25/10/2014 (4) दिनांक 25/11/2014 पुर्वी मालाचा पुरवठा करणे आवश्यक आहे मुदतीत पुरवठा न केल्यास भांडार नियमावलीनुसार विलंबासाठी पुरवठा न केलेल्या मालाच्या किमतीच्या प्रती आठवडा 0.5 टक्के प्रमाणे अथवा सदर रक्कम 1 लाखापेक्षा जास्त असल्यास कमाल 5 टक्के इतका दंड आकारण्यात येईल. 22 प्रकल्पांच्या साठा नोंदवहयाची तपासणी केली असता. वसई-2 प्रकल्प कार्यालयाने 3रा व 4था हप्ता मालाच्या नोंदीचा दिनांक नमुद केलेला नाही. त्याचप्रमाणे डहाणू कासा प्रकल्प कार्यालयाने 2रा, 3रा व 4था हप्ता मालाच्या नोंदीचा दिनांक नमुद केलेला नाही. जव्हार-1 व जव्हार-2 या प्रकल्प कार्यालयाने 1, 2रा, 3रा व 4था हप्ता मालाच्या नोंदीचा दिनांक नमुद केलेला नाही. त्यामुळे सदर टप्प्यांचा पुरवठा विहित कालावधीत झाल्याबाबत स्पष्ट करावे. अन्यथा दंडात्मक कार्यवाही होणे अभिप्रेत होते.

4) महाराष्ट्र शासन, उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, क्रमांक, भांखस-1088/(2512)/उदयोग-6,दिनांक 02/01/1992 अनु. क्रमांक 8.2 व "परिशिष्ट सहा" मध्ये नमुद केल्याप्रमाणे लेंटीन आयोगाच्या शिफारसीनुसार खरेदी समितीतील सर्व सभासदांनी बैठकीपुर्वी प्रस्तावातील कोणत्याही कंपनीशी अथवा निविदाकाराशी माझा वैयक्तीक संबंध नाही, हे प्रतिज्ञापत्र संचिकेत नाही.

5) करारनाम्यातील अटी व शर्ती क्रमांक 5 अन्वये पुरवठा करण्यात येणाऱ्या खजुर (सीडलेसअ) पुरवठा पॅकेटवर जिल्हा परिषदेचा लोगो महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद ठाणे, सन 2014-15 व खजुरातील प्रथिनयुक्त घटकांची टक्केवारी (उदा. कॅल्शियम, आयर्न, कॅलरीज इ.) व माल पॅकिंग करण्याचा दिनांक व माल खराब होण्याचा दिनांकाची नोंद साठा नोंदवहीत नमूद नाही त्यामुळे मालाच्या दर्जा बाबत खात्री करता येत नाही.

6) सन 2013-2014 योजना राबवतांना माहे फेब्रुवारी 2013 च्या मासिक प्रगती अहवालानुसार (संचिका पृष्ठ क्र. 1 अन्वये) जिल्हयातील ग्रामीण प्रकल्पात मध्यम कमी वजनाची 126000 मुले व तीव्र कमी वजनाची 1607 मुले अशी एकूण 14207 मुलांना प्रती दिवस 25 ग्रॅम प्रमाणे अतिरिक्त आहार देणेबाबत टिप्पणी आहे व सन 2014-2015 मध्ये योजना राबवतांना माहे जुन 2014 च्या प्रकल्पांच्या मागणीपत्रानुसार (संचिका पृष्ठ क्र. 11 अन्वये) जिल्हयातील ग्रामीण प्रकल्पात मध्यम कमी वजनाची 39710 मुले व तीव्र कमी वजनाची 10316 मुले अशी एकूण 50026 मुलांना प्रती दिवस 25 ग्रॅम प्रमाणे अतिरिक्त आहार दिलेबाबत आकडेवारीवरून दिसुन येते. सदर आकडेवारीचे अवलोकन करता योजनेची फलश्रुती काय झाली हे स्पष्ट होत नाही.

**3.850 5 वी ते 7 वी शाळेत जाणाऱ्या मुलींना दोन चाकी सायकल पुरविणेबाबत. (जिल्हा परिषद निधी)**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत महिला व बालविकास विभागाचे 5वी ते 7वी शाळेत जाणाऱ्या मुलींना दोन चाकी सायकल पुरविणेकरीता एकूण रक्कम रुपये 48,72,150/- इतका खर्च केला आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, क्रमांक भांखस-1088/(2512)/उदयोग-6, दिनांक 02/01/1992 अनु. क्रमांक 8.2 व "परिशिष्ट सहा" लेंटीन आयोगाच्या शिफारसीनुसार खरेदी समितीतील सर्व सभासदांनी बैठकीपुर्वी द्यावयाचे कोणत्याही कंपनीशी अथवा निविदाकारशी माझा वैयक्तीक संबंध नाही, हे प्रतिज्ञापत्र संचिकेत संलग्न नाही.

2) करारनाम्यातील अटी व शर्ती क्रमांक 4 अन्वये सायकल पुरवठा 60 दिवसाचे मुदतीत करणे आवश्यक होते. मुदतीत पुरवठा न केल्यास विलंबासाठी पुरवठा न केलेल्या मालाच्या किमतीच्या प्रती आठवडा 0.5 टक्के प्रमाणे अथवा सदर रक्कम 1 लाखापेक्षा जास्त असल्यास कमाल 5 टक्के इतका दंड आकारण्यात येईल. प्रकल्पांच्या साठा नोंदवहयाची तपासणी केली असता. जव्हार-1, मुरबाङ-2 इ. प्रकल्पात मालाच्या नोंदीचा दिनांक वर उपरीलेखन केलेले आहे. त्यामुळे सायकल पुरवठा विहित कालावधीत झाल्याबाबत स्पष्ट होत नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक झेडएपी/2008/प्र.क्र.446/वित्त, दिनांक 20/06/2008 मधील "परिशिष्ट ई" मध्ये नमुद केलेल्या वेळापत्रकानुसार सदर योजनेची अंमलबजावणी पुढीलप्रमाणे झालेली नाही. (1) लाभार्थी निवड दिनांक 31 मे अखेर पर्यंत करणे मात्र जिल्हा परिषदेकडे मागणी अर्ज अप्राप्त. (2) पुरवठा आदेश दिनांक 30 ऑगस्ट पर्यंत देणे क्रमप्राप्त पुरवठा आदेश क्रमांक 4 दिनांक 03/01/2015 पुरवठा आदेश दिला आहे. (3) लाभार्थ्यांना साहित्य वाटप दिनांक 30 नोव्हेंबर अखेर साठा नोंदवहीमध्ये दिनांक नमुद नाही. (4) विनियोग दाखले मार्च अखेरपर्यंत घेतले नाही.

**3.851 अंगणवाडीतील मुलांना आयुर्वेदिक सिरप पुरविणेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** महिला व बालकल्याण विभागाने सन 2014-2015 या आर्थिक वर्षात बालकांसाठी हिमेटेनिक आयुर्वेदिक सिरप दिनांक 11/09/2014 च्या पुरवठा आदेशाने 2,857 बॉटल्सवर खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) औषध तपासणीचा प्रयोगशाळेचा टेस्ट रिपोर्ट कार्यनस्तीत ठेवलेला नाही.

2) जिल्हयातील 12 प्रकल्पांना एकूण 2,857 बॉटल्स वाटप करण्याचे पुरवठा आदेश होते. परंतु 5 तालुकास्तरावरील स्टॉक रजिस्टरची तपासणी केली असता त्यांना 917 बॉटल्स प्राप्त झाल्याचे व सिरपचे वाटप झाल्याचे दिसून आले. उर्वरित 7 तालुक्यांतील 1,940 बॉटल्सबाबत तालुकास्तराचे स्टॉक रजिस्टर उपलब्ध झाले नाही. त्यामुळे 1,940 बॉटल्स मुलांना वाटप झाल्याबाबतची पडताळणी करता आली नाही.

3) कार्यनस्तीची पडताळणी करतांना जिल्हयातील 12 प्रकल्पांकडून प्रत्येकी किती सिरप पाहिजेत, याचे संबंधित प्रकल्प अधिकारी यांचे मागणीपत्र कार्यनस्तीत आढळून आले नाही.

**3.852 90 टक्के अनुदानातून महिलांना शिलाई मशीन पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग चे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण केले असता अटी व शर्ती विचारात न घेता योजना राबविली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) गावात 15 वर्षे वास्तव्य असलेबाबत त्या गावच्या सरपंचांचा दाखला घेणेत आलेला नाही.

2) दारिद्र्यरेषेखाली असलेबाबत रेशनकार्डची झेरॉक्स प्रत अथवा दारिद्र्यरेषेखालचा दाखला सादर केलेला नाही.

3) लाभार्थ्यांनी तहसिलदार यांच्याकडिल उत्पन्नाचा दाखला सादर केलेला नाही.

4) लाभार्थ्यांना प्रत्यक्ष वस्तू पोहोच झाल्याबाबतची खात्री करता आली नाही. तसेच मास्टर नोंदवही ठेवलेली नसल्याने लाभार्थ्यांना दुबार लाभ झाला नसल्याची खात्री करता आली नाही.

5) पंचायत समिती गटविकास अधिकारी यांचे सदरच्या योजनेबाबत उपयोगिता दाखले उपलब्ध झालेले नाहीत.

**3.853 कुपोषीत मुलामुलींसाठी तसेच गरोदर महीला व स्तनदा माता यांना अतिरीक्त आहार पुरवीणे मायक्रोन्युट्रीयन्ट चिक्की खरेदीमधील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** महिला बालकल्याण विभागाचे सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात कुपोषीत मुलामुलींसाठी तसेच गरोदर महीला व स्तनदा माता यांना अतिरीक्त आहार पुरवीणे मायक्रोन्युट्रीयन्ट चिक्की खरेदीसाठी प्रमाणक क्रमांक 50,दिनांक 12/01/2015 रुपये 49,99,990/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर मायक्रोन्युट्रीयन्ट चीक्की खरेदी करण्यापूर्वी प्रकल्पाकडून अंगणवाडीनिहाय मागणीपत्र प्राप्त करुन एकत्रित गोषवारा तयार करुन त्याप्रमाणे खरेदी करणे आवश्यक आहे. तशी पध्दत अवलंबविलेली दिसुन येत नाही.

2) आहाराचा चाचणी अहवाल केंद्रीय तपासणी प्रयोगशाळा यांचेकडून न घेता पुरवठादार यांनी सादर केला आहे.

3) प्रकल्पनिहाय अंगणवाडी केंद्रातील बालकांची दरमहा होणारी श्रेणीनिश्चिती करुन वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत तपासणी अहवाल नस्ती सोबत नाही. योजनेची फलनिष्पत्ती व योजना किती सफल झाली याचा मासिक / सहामाही अहवाल जिल्हा परिषदेला सादर केलेला दिसून येत नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 चे नियम 98 सक्षम अधिकारी यांनी साठा नोंदवहीतील शिल्लक परिमाण व भांडारातील परिमाण याची नियमितपणे पडताळणी केलेली नाही.

5) साठा नोंदवहीत चिक्की वाटप केल्याबाबत मुख्य सेविका / अंगणवाडी मदतनीस यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. प्रत्यक्ष आहार कुपोषित मुला-मुलींना तसेच गरोदर व स्तनदा मातांना दिल्याची खात्री करता आली नाही. तसेच विनियोग दाखला जिल्हा परिषदेस सादर करणे आवश्यक आहे.

6) सदरची खरेदी ही जाहीर निविदा तसेच ई-टेंडरींगद्वारे खरेदी करण्यात आलेली नाही. त्यामुळे जिल्हा परीषदेस दर स्पर्धात्मकतेचा लाभ झालेला नाही. तसेच शासनमान्य रेट कॉन्ट्रॅक्ट प्रत नस्तीसोबत नाही.

7) मध्यम व तीव्र कुपोषित बालकांना आहार दिल्यानंतर होणाऱ्यां श्रेणीवर्धनाची माहिती असलेल्या नोंदवह्या लेखापरीक्षणास प्राप्त झाल्या नाहीत.

8) प्रकल्प स्तरावरील आढावा अहवाल लेखापरीक्षणास सादर करावा.

9) मालाचा पुरवठा 15 दिवस विलंबाने केल्याणे रुपये 49,999/- दंड रक्कम वसुल करणे आवश्यक आसतांना रुपये 16,722/- केल्याचे अढळुन आले. उर्वरित दंड रक्कम रुपये 33,277/- वसुल करणे आवश्यक आहे. तसेच मुल्यवर्धीत कर कपात रुपये 2,50,000/- वसूल केलेला नाही.

10) शासन निर्णय क्रमांक जिप/1007/454/प्र.क्र.51/पंरा/1,दिनांक 19/12/2000 नुसार कुपोषित मुला-मुलींना तसेच गरोदर व स्तनदा माता यांना पुरविण्यात येणाऱ्या आहाराव्यतिरिक्त स्थानिक उपलब्धतेनुसार विशेष आहार पुरवठा करण्यात यावा. त्यानुसार कार्यवाही केल्याचे आढळून आलेले नाही.

**3.854 जिल्हा परिषद सेस फंडातील सन 2014-15 या आर्थीक वर्षात ग्रामिण भागातील मुलींना संगणक दुरुस्ती प्रशिक्षण देणेबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** अहवालात अनुक्रमांक 1 ते 10 प्रकल्पानुसार लाभार्थी संख्या 386 व खर्च रुपये 17,37,000/- बाबत स्थिती खालील प्रमाणे आहे.

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/ पंरा-1,दिनांक 24/01/2014 नुसार जिल्हा परिषदे मध्ये स्थापन करण्यात आलेल्या बाल कल्याण समितीने राबवावयाच्या योजना

याबाबत मार्गदर्शक सुचनांचे पालन केलेले नाही. महिला व बाल विकास विभागाने संगणक दुरुस्ती प्रशिक्षण ही योजना राबविलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महिला व बाल विकास विभागाने जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे, शिरपूर, शिंदखेडा व साक्री येथील स्थानिक किमान कौशल्य व शासकीय तंत्रानिकेतन, व्होकेशनल ट्रेनिंग प्रोग्राम देणाऱ्या संस्था यांचेकडे प्रशिक्षण घेणेबाबत पत्रव्यवहार केलेला नाही. अथवा इतर कोणत्याही संस्थेचे दर मागविण्यात आलेले नाहीत, SIKLL DEVELOPMENT SCHEME अंतर्गत Director General of Employment and Training या संस्थेमध्ये धुळे येथे 5 संस्था मान्यताप्राप्त असतांना त्याचेकडील दर न मागविता मे. इन्फोटेक कॉम्प्युटर एज्युकेशन, शिरपुर, जिल्हा धुळे या एकाच संस्थेचे दर मागविण्यात आलेले आहे व त्यांना कामाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. संस्थेने दिलेले दर योग्य आहेत याबाबत पडताळणी करणेत आली नाही. शासन निर्णय दिनांक 02/01/1992 चे पालन न करणे ही बाब गंभीर वित्तीय अनियमिता आहे.

2) इन्फोटेक कॉम्पुटर शिरपूर यांनी रुपये 5,000/- दर नमुद केलेले आहेत. त्यापैकी रुपये 4,500/- जिल्हा परिषदे मार्फत व रुपये 500/- लाभार्थी यांनी स्वत: संस्थेकडे जमा केलेले आहेत. लाभार्थी हिस्सा जिल्हा परिषद लेख्यात समाविष्ट नाही.

3) इन्फोटेक कॉम्पुटर हे व्होकेशनल ट्रेनिग प्रोव्हाडर संस्था शिरपूर येथे आहे. ह्या संस्थेच्या इतर ठिकाणी शाखा नाहीत. लाभार्थ्यांना कोठे व कसे प्रशिक्षण दिलेले आहे. याबाबत अभिलेख पंचायतीच्या दप्तरी आढळून आलेले नाहीत, विदयार्थांना या प्रशिक्षणाचा योग्य लाभ देण्यात आलेला आहे किंवा कसे हे अभिलेख्यांवरुन दिसून येत नाही. महिला व बाल कल्याण विभागाने आगाऊ रक्कम संस्थेला दिलेली आहे.

4) धुळे येथे जिल्हा व्यवसाय प्रक्षिण केंद्र, शासकीय तंत्रानिकेतन व किमान कौशल्य आधारीत कोर्स उपलब्ध असतांना सर्व शिरपूर येथे प्रशिक्षणास पाठविण्यात आलेले आहे.

5) एस.डी.आय.एस. यांचे दिनांक 07/01/2014 च्या पत्रानुसार बी.इ.ए.101 हा कोर्स 150 तासांचा असुन फी रुपये 800/- नमुद केलेली आहे. प्रती तास 27.50/- या दराने 150 तासाच्या कोर्ससाठी रुपये 4,125/- इतकी फी असतांना इन्फोटेक कॉम्प्युटर शिरपूर यांनी 300 तासांचा कोर्ससाठी 5,000/- दर नोंदविलेला आहे. मुळ कोर्स 150 तासाचा असतांना 300 तासाचा दर स्विकारण्यात आला आहे. सबब कोर्स मोडयूल व देण्यात आलेली फी योग्य आहे की नाही. याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

6) संगणक दुरुस्ती कोर्ससाठी आय.सी.टी.-205 हा 180 तासाचा कोर्स असुन फी रुपये 800/- नमुद आहे. दिनांक 07/01/2014 च्या पत्रानुसार रुपये 27.50/- प्रती तास प्रमाणे रुपये 4,950/- इतकी फी येत आहे. इन्फोटेक कॉम्पुटर यांना रुपये 5,000/- दराने रक्कम अदा केलेली आहे.

7) संस्था ही सेवा स्वरुपाची असल्यामुळे central board of excise and custums यांचे परिपत्रकानुसार सदर संस्था ही सेवाकर नोंदणी क्रमांक असलेली संस्था नाही.

8) संस्था ही सेवाकराशी निगडीत असल्याने आयकर अधिनियम 194 जे प्रमाणे 10 टक्के टी.डी.एस. कपात करणेबाबत तरतूद असतांना या संस्थेला टी.डी.एस. कपात न करता रक्कम अदा केलेली आहे, तरी टी.डी.एस. रुपये 1,73,000/- वसुलपात्र ठरते.

9) व्होकेशनल ट्रेनिंगसाठी ऑन लाईन रजिस्ट्रेशन करण्यात आलेले असुन फॉर्म व सर्टीफिकेट्स विभागाच्या दप्तरी ठेवण्यात आलेले नाहीत. लाभार्थ्याचे कोर्स पुर्ण केलेबाबत सर्टिफीकेट्स उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्याशिवाय योजनेची फलनिष्पत्ती स्पष्ट दिसून येत नाही. पुरवठा आदेशातील अटीनुसार लाभार्थानी प्रशिक्षण पूर्ण करणे बंधकारक आहे. नस्तीत जोडलेल्या अहवालानुसार बरेच विदयार्थी हे गैरहजर अथवा नापास झालेले आहेत. प्रशासकीय अटी प्रमाणे सर्व लाभार्थ्यांना लाभ देणे आवश्यक आहे. अहवालात अनुक्रमांक 1 ते 9 नुसार एकुण 386 लाभार्थीमध्ये संगणक दुरुस्ती, ब्युटी पार्लर,एम.एस.सी.आय.टी. याप्रमाणे प्रस्ताव सादर केलेले आहेत.

प्रत्येक कोर्सचे दर वेगळे असतांना संस्थेला रुपये 5,000/- प्रमाणे रक्कम प्रदान केलेली आहे. सर्व 386 कर्मचारी यांचे प्रशिक्षण पूर्ण केलेबाबत प्रमाण पत्र लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही.

10) प्रसिध्दी देऊन अर्ज मागविलेले नाहीत. प्राप्त अर्जावर दाखल तारीख व सही नमुद नाही. लाभार्थींची निवड महिला व बालकल्याण समितीने केलेली दिसत नाही.

**3.855 आदिवासी उपयोजना क्षेत्रातील व क्षेत्राबाहेरील सन 2014-15 या आर्थीक वर्षात ग्रामिण भागातील मुलींना संगणक दुरुस्ती प्रशिक्षण देणेबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 नुसार जिल्हा परिषदेमध्ये स्थापन करण्यात आलेल्या बालकल्याण समितीने राबवावयाच्या योजना याबाबत मार्गदर्शक सुचनांचे पालन केलेले नाही. महिला व बाल विकास विभागाने संगणक दुरुस्ती प्रशिक्षण ही योजना राबविलेली आहे. यावर रक्कम रुपये 2,97,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महिला व बाल विकास विभागाने जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्था धुळे, शिरपूर, शिंदखेडा व साक्री येथील स्थानिक किमान कौशल्य व शासकीय तंत्रनिकेतन, व्होकेशनल ट्रेनिंग प्रोग्राम देणाऱ्या संस्थाकडे प्रशिक्षण घेणेबाबत त्या संस्थेकडे पत्रव्यवहार करण्यात आलेला नाही. अथवा इतर कोणत्याही संस्थेचे दर मागविण्यात आलेले नाही, SIKLL DEVELOPMENT SCHEME अंतर्गत Director General of Employment and Training या संस्थेमध्ये धुळे येथे 5 संस्था मान्यताप्राप्त असतांना त्यांचेकडील दर न मागविता इन्फोटेक कॉम्प्युटर एज्युकेशन शिरपुर, जिल्हा धुळे या एकाच संस्थेचे दर मागविण्यात आलेले आहे व त्यांना कामाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. शासन निर्णय दिनांक 02/01/1992 चे पालन न करणे ही बाब गंभीर वित्तीय अनियमिता आहे.

2) इन्फोटेक कॉम्पुटर शिरपूर यांनी रुपये 5,000/- दर नमुद केलेले आहेत. त्या पैकी रुपये 4,500/- जिल्हा परिषदे मार्फत व रुपये 500/- लाभार्थी स्वत: संस्थेकडे जमा केलेले आहेत लाभार्थी हिस्सा जिल्हा परिषद लेख्यात समाविष्ट नाही.

3) इन्फोटेक कॉम्पुटर हे व्होकेशन ट्रेनिग प्रोव्हाडर ही संस्था शिरपूर येथे आहे. त्या संस्थेच्या जिल्हात इतर ठिकाणी संस्था नाहीत. लाभार्थ्यांना कोठे व कसे प्रशिक्षण दिलेले आहे याबाबत अभिलेख पंचायतीच्या दप्तरी आढळून आलेले नाहीत, विदयार्थांना या प्रशिक्षणाचा योग्य लाभ देण्यात आलेला आहे किंवा कसे हे अभिलेख्यावरुन दिसून येत नाही. महिला व बाल कल्याण विभागाने आगाऊ रक्कम संस्थेला दिलेली आहे.

4) सर्व जिल्हातील लाभार्थ्यांना शिरपूर येथे प्रशिणास पाठविण्यात आलेले आहे. विहित निविदा पध्दत वापरलेली नाही.

5) एस.डी.आय.एस. यांचे दिनांक 10/10/2014 च्या पत्रानुसार संगणक दुरुस्ती कोर्ससाठी आय.सी.टी.-705 हा 500 तासांचा कोर्स आहे. इन्फोटेक कॉम्पुटर शिरपूर यानी 300 तासाच्या कोर्ससाठी रुपये 4,500/- दर नमुद केलेला आहे. एम.ई.एस. कोर्स कोड नंबर आय.सी.टी. 702 हा 500 तासाचा कोर्स 300 तास नमुद केलेला आहे कोर्स कालावधीत विसंगती आहे. 300 तासासाठी 27.50/- दराने कोर्स खर्च 8,250/- असा असतांना रुपये 5,000/- असा दर संस्थेने नमुद केलेला आहे.

6) संस्था ही सेवा स्वरुपाची असल्यामुळे central board of excise and custums यांचे परिपत्राकानुसार सदर संस्था ही सेवा कर नोंदणी क्रमांक असलेली संस्था नाही.

7) संस्था ही सेवा कराशी निगडीत असल्याने आयकर अधिनियम 194 जे प्रमाणे 10 टक्के टी.डी.एस. कपात करणे बाबत तरतूद असतांना या संस्थेला टी.डी.एस. कपात न करता रक्कम अदा केलेली आहे, तरी टी.डी.एस. रुपये 29,700/- वसुलपात्र ठरते.

8) इन्फोटेक कॉम्पुटर यांनी दिलेली दर योग्य आहेत याबाबत पडताळणी करण्यात आलेली नाही. शासनाने मर्यादित केलेली रक्कम खर्च केलेली आहे.

9) व्होकेशनल ट्रेनिंगसाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्यात आलेले असुन फॉर्म व सर्टीफिकेट्स विभागाच्या दप्तरी ठेवण्यात आलेले नाही. लाभार्थ्याचे कोर्स पुर्ण केलेबाबत सर्टिफीकेट्स उपलब्ध करणे आवश्यक आहे.

त्याशिवाय योजनेची फलनिष्पत्ती स्पष्ट दिसून येत नाही. पुरवठा आदेशातील अटीनुसार लाभार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण करणे बंधकारक आहे. नस्तीत जोडलेल्या अहवालानुसार बरेच विदयार्थी हे गैरहजर अथवा नापास झालेले आहेत. प्रशासकीय अटी प्रमाणे सर्व लाभार्थ्यांना लाभ देणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांचे लाभ् दिलेबाबत प्रशिक्षण पूर्ण केले व पास झाले आहेत, याबाबत प्रमाणपत्र लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

10) अर्ज न मागवता लाभार्थी निवड केलेली आहे. प्राप्त अर्जावर दाखल तारीख व सही नमुद नाही, अर्जाची छाननी लाभार्थांना लाभ देण्यात आलेला आहे, असा ठरावा समितीच्या इतिवृत्तात नोंदविण्यात आलेला नाही.

संस्थेची निवड ही विहित पध्दतीने करण्यात आलेली नाही, दर निश्चीत करण्यात आलेले नाही, कोर्स मॉडयूल प्रमाणे कोर्स पूर्ण करण्यात आलेला नाही, संस्थेला आगाऊ प्रदान करण्यात आलेले आहे, टी.डी.एस. कपात केलेला नाही, सर्व लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे, विदयार्थी पास झालेले आहेत या बाबत ऑन लाईन सर्टिफिकेट विभागात ठेवण्यात आलेले नाही, तरी ऑन लाईन प्रमाणपत्रे प्राप्त करण्यात यावीत, तसेच संस्थेचा दराबाबत व संस्था निवडी बाबत प्रशासकीय चौकशी करुन कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**3.856 जिल्हा परिषद सेस फंडातील सन 2014-15 या आर्थीक वर्षात ग्रामिण भागातील मुलींना सौदर्य प्रसाधनाचे प्रशिक्षण देणेबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदर प्रशिक्षणावर रक्कम रुपये 6,03,000/- खर्च करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/पंरा-1,दिनांक 24/01/2014 नुसार जिल्हा परिषदेमध्ये स्थापन करण्यात आलेल्या बालकल्याण समितीने राबवावयाच्या योजना या बाबत मार्गदर्शक सुचनांचे पालन केलेले नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

**3.857 आदिवासी उपयोजना अंतर्गत नंदुरबार जिल्हयातील ग्रामीण मुलींना संरक्षणासाठी कराटे प्रशिक्षण देणेबाबत.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** नंदुरबार जिल्हयातील ग्रामीण मुलींना संरक्षणासाठी कराटे प्रशिक्षणासाठी रक्कम रुपये 4,99,800/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) योजना राबविण्याचा अटी व शर्तीनुसार संस्थेने प्रशिक्षण कामाचे स्वरुप तसेच कार्यक्रम पत्रिका कार्यालयाकडुन मंजुर करुन घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) मंजुर अटी नुसार मुलींना स्वरंक्षणासाठी कराटे प्रशिक्षण शिबिराचे नियोजन त्या-त्या क्षेत्रातील बालविकास प्रकल्प अधिकारी यांचे पुरावे म्हणुन सत्र निहाय स्वतंत्र फोटो सादर करणे बंधनकारक राहील. त्या प्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

3) प्रत्यक्ष सत्रास उपस्थित मुली यांचे पुर्ण नांव,पत्ता,उपस्थितीबाबत हजेरीपत्रक नस्तीसोबत आढळुन आलेली नाही.

4) सदर शिबीर पुर्ण कालावधी 3 महिने झाले कि नाही याबाबत त्या-त्या क्षेत्रातील बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी शिबीर पुर्ण झाले याबाबत दाखला नस्ती सोबत दिसुन येत नाही.

**3.858 टीएसपी योजने अंतर्गत (आदिवासी उपाय योजना) मायक्रो न्युट्रीन चिक्की पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** याबाबत अहवाल वर्षात महिला व बालकल्याण समितीने राबवावयाच्या एससीपी योजने अंतर्गत सन 2014-15 साठी प्रती 100 ग्रॅम याप्रमाणे एकूण 87718 नग चिक्की पॉकीट दर रुपये 28.50 याप्रमाणे एकूण रक्कम रुपये 24,99,963/- खर्च केलेला असून त्यासाठी सुर्यकांता महिला औद्यौगिक सहकारी संस्था मर्या. वेंगुर्ला, जिल्हा सिंधुदुर्ग यांना प्रदान केलेली आहे. सदर योजनेच्या अभिलेख्याची पडताळणी केली असता त्यात आढळून आलेल्या अनियमितता बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मासीक प्रगती अहवाल ऑक्टोंबर 2014 नुसार रावेर-2 ची उपस्थीत लाभार्थी मागणी 3414 असून त्याप्रमाणे प्रकल्पास पुरवठा केलेला असून सदर मासीक प्रगती अहवालाची प्रत्यक्ष बेरीज घेतली असता ती 3012 इतकी येते म्हणजेच 402 लाभार्थी चे जादा वाटप केलेले आहे. तरी जादा वाटप झालेल्या मालाची रक्कम रुपये 34,210/- वसूल करुन रक्कम शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

2) उद्योग संचालनालयाकडील दिनांक 08/08/2012 चे पत्रानुसार माल कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर 90 टक्के रक्कम दोन आठवड्यामध्ये द्यावयाची आहे. उर्वरित 10 टक्के रक्कम सर्व मालाची पोच सुस्थितीत व विनीर्देश प्रमाणे झाल्यानंतर 30 दिवसापर्यंत देणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे प्रदानाची कार्यवाही केलेली नाही. तसेच पुरवठा झालेल्या मालाची गुणवत्ते बाबतची तपासणी मागणीकार कार्यालयाने केलेली नाही.

3) दिनांक 06/01/2015 च्या पुरवठा आदेशातील अटीशर्ती क्रमांक 3 नुसार चिक्की पुरवठा झालेनंतर रॅडम सॅम्पल तपासणीचे शासकीय अथवा खाजगी प्रयोगशाळेचे तपासणी प्रमाणपत्र देयक प्रदान करतेवेळी त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4) दिनांक 06/01/2015 च्या पुरवठा आदेशातील अटीशर्ती क्रमांक 5 नुसार बँच क्रमांक, निर्मिती दिनांक / मुदत संपण्याचा कालावधी, परवाना क्रमांक इत्यादी आवश्यक त्याबाबी छपाई केल्याचे आढळून आले नाही.

5) पुरवठा चलनावर, प्रकल्पांना पुरवठा केलेल्या साठा नोंदवहयांचा दिनांक नमुद केलेला नाही. त्यामुळे मात्र विहीत मुदतीत पोहच झाले बाबतची खात्री करता आली नाही.

6) खर्च उपयोगीता प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

7) मुळ बिलावर अनुक्रमांक नाही.

8) यावल प्रकल्पाची मागणी 7155 ची असून पुरवठा 2922 इतका केला. पुरवठा कमी करणे बाबत समर्पक खुलासा करणे आवश्यक आहे.

**3.859 नाविन्यपुर्ण योजनेतून शाश्वत कुपोषण मुक्ती करता इलेक्टॉनिक वजनकाटे खरेदी करणेबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2014-15 वर्षासाठी नाविण्यपुर्ण योजनेतुन श्वाश्वत कुपोषण मुक्त करता इलेक्टॉनिक वजनकाटे खरेदी करणे ही योजना राबविण्यात आलेली आहे. कामाचा दर करार 10/- रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर करण्यात आलेला आहे. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 नुसार रुपये 23,300/- इतक्या रकमेचे मुद्रांक शुल्क घेणे आवश्यक आहे. ती वसुल करुन शासन जमा करावी.

2) करारनामा अट क्रमांक 9 अनुसार हमीपत्र घेण्यात आलेले नसुन काम पुर्णत्वाचे दाखले, उपयोगिता प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल प्राप्त झाला नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त 9,दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषदांनी राबविण्यात येणा-या वेळापत्रकानुसार राबविणे आवश्यक असतांना हि योजना वेळापत्रकानुसार राबविलेली नाही.

**3.860 जिल्हा परिषद सेस अंतर्गत ग्रामिण भागातील आदर्श पर्यवेक्षिका/सेविकांना पुरस्कार देणेबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** ग्रामीण भागातील आदर्श पर्यवेक्षिका / सेविकांना पुरस्कार देणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्रमांक मबाक-2/361/14,दिनांक 17/06/2014 रूपये 3,00,000/- अनुदान प्राप्त झाले असून पुरस्कारात 162 सन्मान चिन्ह व 160 प्रमाणपत्र पुरविल्यापैकी 150 लाभार्थीना वाटप करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उप प्रमाणक क्रमांक 1059,दिनांक 27/08/2014 अन्वये प्रसाद फोटो यांना रुपये 11,200/- देण्यात आले. फोटो व व्हीडीओ शुटींगसाठी देण्यात आलेले असुन किती प्रती फोटो काढलेत याचा उल्लेख नसल्यामुळे अदा रक्कम बरोबर असलेबाबत खात्री पटवावी.

2) उप प्रमाणक क्रमांक 881,दिनांक 27/08/2014 अन्वये 157 सन्मानचिन्ह व प्रमाणपत्रासाठी चिंतामणी आर्टस अहमदनगर रुपये 35,290/- चा खर्च पुरस्कार वितरणसाठी अदा करण्यात आले असुन लहान, मध्यम व मोठे साईज यांचा उल्लेख नाही.

3) उप प्रमाणक क्रमांक 11321,दिनांक 27/08/2014 अन्वये सृष्टी सारीज, अहमदनगर यांना रुपये 99,100/- चा खर्च साड्या व शाली वितरण करणेसाठी अदा करण्यात आले. मात्र नग संख्या नमुद नसल्याने खर्चाबाबत खात्री करता आली नाही.

**3.861 इयत्ता 7 वी ते 12 वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण खर्चाबाबत**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** महिला बाल कल्याण विभागाने जिल्हा निधीमधुन इयत्ता 7 वी ते 12 वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण देणेसाठी केलेला खर्च रक्कम रुपये 8,44,850/- बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त-9 दिनांक 20/06/2008 अन्वये परिशिष्ट इ नुसार विनियोग दाखले / प्रमाणपत्र 31 मार्च पर्यंत सादर करणे आवश्यक असतांना लेखा परीक्षण कालावधी पर्यंत उपलब्ध झाले नाही. तरी शासनाच्या योजना राबविण्याचा उद्देश सफल झाल्याचे दिसून येत नाही.

2) तालुका निहाय पंचायत समिती स्तरावरील यादी व जिल्हा परिषद मंजूर यादी व अनुदान वितरण तपासले असता पंचायत समिती भोर, दौंड, इंदापूर, खेड, व बारामती या तालुक्यांची प्रस्तावीत यादी 386 नस्ती सोबत दिसून आली. अनुदान वितरण 386 लाभार्थ्यासाठी करणेचे असतांना 637 लाभार्थी मंजूर करुन 637 लाभार्थ्यासाठी रक्कम रुपये 19,42,850/- अनुदान वितरीत करण्यात आले. उर्वरीत 251 लाभार्थी पंचायत समिती कडील प्रस्ताव यादी नस्ती सोबत नसतांना रक्कम रुपये 7,65,550/- वितरीत करण्यात आल्याने 251 लाभार्थ्यासाठीची वितरीत करण्यांत आलेल्या अनुदानाची रक्कम रुपये 7,65,550/- (251X3050) वसुलांत आणावी.

3) तालुका भोर-1, तालुका दौंड-1, तालुका खेड-1, पुरंदर-19, बारामती-2, हवेली-2 असे एकूण 26 लाभार्थ्याची नांवे दुबार आढळून आल्याने त्यांना वाटप करण्यांत आलेली अनुदानाची रक्कम रुपये 3,050/- प्रमाणे रक्कम रुपये 79,300/- वसुलांत आणावे.

**3.862 ग्रामीण भागातील महिलांना सौरकंदील पुरविणे बाबतच्या अनियमितते बाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** महिला बाल कल्याण जिल्हा परिषद निधीतून ग्रामीण भागातील महिलांना सौरकंदील पुरविणे बाबतचे प्रमाणक क्रमांक 10,दिनांक 31/03/2015 अन्वये खर्च रक्कम रुपये 49,99,752/- याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2008/ प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 अन्वये परिशिष्ट इ नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनाकरीता कार्य कालावधी नुसार योजना राबविली नाही.

2) संपूर्ण साहित्य वाटपाचे प्रमाणपत्र किंवा विनियोग दाखले पंचायत समिती कडून घेतलेले नाहीत.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम क्रमांक 146 नुसार केलेला करारनामा नियम 147 नुसार नमुना 48 मध्ये नोंदविणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4) संबंधित पुरवठादारांच्या टॅक्स इनव्हाईसवर विभागाचे पासींग शेरा नाही.

5) तालुक्यांच्या पोहोच पावतीवर किती नग प्राप्त ची संख्या पंचायत समितीने दर्शविलेली नाही.

6) तालुका शिरुर,पंचायत समितीकडून प्राप्त लाभार्थी यादीत 15 लाभार्थीचे नांव नसतांना महिला बाल कल्याण विभागाने लाभार्थी निवड केलेली आहे. मुळशी, दौंड व भोर तालुक्यातील मंजूर लाभार्थी संख्या, मंजुर लाभार्थी यादी तपासता प्रत्यक्ष तालुक्यांची सादर केलेली यादी कमी जास्त करुन अनियमितता केलेली आहे.

7) तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी 50 लाखाची असतांना साहित्य खरेदी रक्कम रुपये 55,55,280/- केल्याने नियमबाहयता झाली आहे.

8) अटी व शर्तीनुसार लाभार्थीने 10 टक्के हिस्सा भरणा केले बाबत चलन उपलब्ध नाही.

9) लाभार्थीचे प्रस्ताव नस्ती सोबत उपलब्ध नाही.

10) लाभार्थीने या योजनेचा लाभ जिल्हा परिषदेचे इतर विभाग अगर विभागाकडून मागील 5 वर्षात घेतलेला नसावा याबाबतचे प्रमाणपत्र नस्ती सोबत उपलब्ध नाही.

11) महिला व बालकल्याण विभागाने लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, निर्णय क्रमांक मागास1098/प्र.क्रं.73/34,दिनांक 20/10/1999 प्रमाणे विहीत नमुन्यांत गावनिहाय लाभार्थी नोंदवही ठेवली नसल्याने दुबार लाभाची शक्यता तालुक्यामध्ये आढळते.

### 3.863 इयत्ता 5 वी ते 12 वी मध्ये शाळेत शिकणाऱ्या मुलींना लेडिज सायकल पुरविणे.

**जिल्हा परिषद सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** महिला बाल कल्याण समिती मंजूरीनुसार लेडिज सायकलबाबत शासन दरकराराद्वारे खरेदीसाठी रक्कम रुपये 29,96,928/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद, सातारा यांचे पत्र क्रमांक मबाक/कावि-2/398/2015,दिनांक 23/03/2015 अन्वये 968 लाभार्थींच्या पात्रतेबाबत पडताळणी करणेस सुचित केले आहे. मात्र पुरवठादारास दिनांक 10/02/2015 रोजी पुरवठा आदेश दिला आहे. त्यामुळे लाभार्थी निवड प्रक्रिया परिपुर्ण होणेपुर्वीच पुरवठा आदेश देण्यात आला आहे.

2) महिला बाल कल्याण समिती यांनी एकूण 968 लाभार्थींना माहे ऑगस्ट 2014 ते मार्च 2015 या दरम्यानच्या एकूण 6 सभांद्वारे टप्प्याटप्प्याने मंजूरी दिली आहे. याबाबीमुळे ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446वित्त-9,दिनांक 30/06/2008 मधील परिशिष्ट “इ” मध्ये नमूद केल्याप्रमाणे 31 मे अखेर लाभार्थी निवड करण्याची कार्यवाही झाली नाही.

3) पुरवठा आदेशाच्या दिनांकाबाबत उपरीलेखन केले आहे. तर करारनाम्यावरील पुरवठा आदेश दिनांक वेगळा आहे. या बाबीमुळे एकाच पुरवठा आदेशासाठी दिनांक 10/02/2015, 05/03/2015 व 18/02/2015 असे तीन वेगळे दिनांक नमूद केले आहेत.

सायकली पोहोच बाबतचे डिलीव्हरी चलने पाहता पंचायत समिती जावली, कोरेगांव, वाई, पाटण व माण यांनी त्यांच्या मालसाठा नोंदवहीतील पृष्ठ क्रमांक नोंदले नाहीत. तसेच पंचायत समिती वाई यांनी सायकल प्राप्त महिना उपरीलेखनाने दिनांक 30/03/2015 नमूद केला आहे. उर्वरीत पंचायत समिती यांनी माल प्राप्त दिनांक नमूद केला नाही.

यामुळे पुरवठा आदेश अट क्रमांक 7 नुसार दिनांकित पोहोच देणे याबाबीचे पुरवठादार व पंचायत समिती यांनी पालन केले नाही. पुरवठा आदेशात पुरवठयाच्या मुदतीचा कालावधी नमूद आहे. मात्र उशीराने केलेल्या पुरवठयाबाबत करारनाम्यात कालावधी व दर नमूद केले नाहीत. त्यामुळे वेळेत पुरवठा करण्याचे बंधन पुरवठादारावर राहिले नाही.

4) पुरवठा आदेशानुसार पंचायत समिती खटाव यांना 203 सायकल मंजूर असतांना डिलीव्हरी चलन दिनांक 25/03/2015 नुसार 195 म्हणजे 8 सायकल कमी पुरविल्या आहेत. त्यामुळे तेवढे लाभार्थी वंचित राहिले आहेत.

पंचायत समिती कराड यांना पुरवठा आदेशानुसार 142 सायकल मंजूर असतांना डिलीव्हरी चलन दिनांक 25/3/2015 नुसार 150 म्हणजे 8 सायकल जादा पुरवठा केला आहे. लाभार्थी मंजूर नसतांना सायकल पुरविल्याने त्यापोटी जादा प्रदान रक्कम रुपये 24768/- वसूलपात्र आहे.

5) पुरवठा आदेश अट क्रमांक 2 नुसार लेडिज सायकल तपासणी शासकीय संस्था / औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांचेकडून केली जाईल व सायकल आय. एस. आय. मार्क स्पेसिफिकेशनप्रमाणे असलेची खात्री करुन देयक आदा केले जाईल, असे नमूद आहे मात्र असा तपासणी अहवाल दप्तरी नाही व पुरवठादाराकडे आय.एस.आय. मानांकनाबाबतचे प्रमाणपत्र दप्तरी नाही. याबाबीमुळे नियमबाहयता झाली आहे.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1094/सीआर/2239/34,दिनांक 20/10/1999 मधील परिच्छेद क्रमांक 4 नुसार गावनिहाय लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवली नसल्याने दुबार लाभ दिला नसलेची खात्री झाली नाही.

7) सदर योजना ग्रामीण व दुर्गम भागातील मुलींकरीता आहे. मात्र 968 प्रस्तावांपैकी दुर्गम तालुके जावली 25 व महाबळेश्वर 18 असे कमी लाभार्थी आहेत. सायकली प्राप्त झाल्याबाबत पोहोच दप्तरी नाहीत. सायकल प्राप्त वाटप, शिल्लक असा पंचायत समिती निहाय अहवाल घेतला नाही. उद्दीष्टानुसार मुली सायकल वापरत असून उपस्थिती व गुणवत्ता यात वाढ झाल्याबाबत प्रमाणपत्रे दप्तरी नाहीत. त्यामुळे योजना फलद्रुप झाल्याचे प्रमाणीत होत नाही.

**3.864 ग्रामीण भागातील महिलांना पिठाची गिरणी पुरविणे.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** महिला बाल कल्याण समितीने मंजूरी दिल्याप्रमाणे पिठाची गिरणी खरेदीसाठी रक्कम रुपये 19,94,422/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महिला बाल कल्याण समिती, जिल्हा परिषद सातारा यांनी दिनांक 03/07/2014 रोजी योजना प्रस्तावित केली तथापि प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता दिनांक 01/12/2014 रोजी म्हणजे 5 महिने उशीराने दिली त्यामुळे महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 30/6/2008 मध्ये नमूद वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

2) ई निविदा उघडणेचा दिनांक 09/01/2015 विहीत केला असतांना 26 दिवस उशीराने ई निविदा उघडली आहे. त्यामुळे पुढील कार्यवाहीस विलंब झाला आहे.

3) प्राप्त 4 निविदोपैकी 2 निविदा अटी शर्तीनुसार पात्र ठरल्या नाहीत. उर्वरीत दोन निविदांसोबतच्या कागदपत्रांनुसार दोन्ही पुरवठादार संस्थांचा मालक एकच असल्याने निविदा प्रक्रिया सदोष झाली असून जिल्हा परिषदेस स्पर्धात्मक दराचा फायदा मिळाला नाही.

4) पुरवठादाराच्या निविदेसोबतचे आय.एस.आय. मानांकनाचे प्रमाणपत्र हे पुर्ण पिठाच्या गिरणीसाठी नसून फक्त मोटारसाठी आहे. त्यामुळे पिठाची गिरण आय.एस.आय. मार्क प्रमाणीत नसल्याने नियमबाहयता झाली आहे.

5) सदर योजनेसाठी लाभार्थी निवडीचे निकष ठरविले नाहीत. महिला बालकल्याण समितीने माहे ऑगस्ट 2014 ते मार्च 2015 या दरम्यान सहा वेगवेगळया सभांद्वारे लाभार्थी निवड केली आहे. त्यामुळे उपरोक्त शासन परिपत्रक दिनांक 30/6/2008 मध्ये नमूद केल्यानुसार 31 मे पुर्वी लाभार्थी निवड झाली नाही. तसेच गावनिहाय लाभार्थी मास्टर नोंदवही ठेऊन दुबार प्रदान झाले नसलेबाबत पंचायत समिती निहाय प्रमाणपत्रे घेतलेली नाहीत.

6) पंचायत समिती फलटणकडील 17 लाभार्थी मंजूर असतांना 15 नग पुरविले आहेत. त्यामुळे 2 लाभार्थ्यांना वंचित रहावे लागले आहे. पंचायत समिती खटाव 36 मंजूर लाभार्थी असतांना 38 नग पुरविले आहेत. लाभार्थी मंजूर नसतांना जादा 2 नग वाटपाचे रक्कम रुपये 20,884/- वसुल करणे आवश्यक आहे.

7) पुरवठा आदेश दिनांक 06/02/2015 मधील अटीनुसार साहित्य प्राप्त झाल्याबाबत दिनांकित पोहोच देणे आवश्यक असतांना, सर्वच पंचायत समितींनी डिलीव्हरी चलनावर प्राप्त दिनांक नमूद केला नाही. पंचायत समिती महाबळेश्वर, वाई, खंडाळा जावली व कोरेगांव यांनी साठा नोंदवही पृष्ठ क्रमांक नमूद केला नाही. पंचायत समिती सातारा व पाटण यांनी पृष्ठ क्रमांक उपरीलेखनाने नमूद केले आहेत.

8) पंचायत समिती स्तरावरील पोहोच पावत्या पाहता माहे मे 2015 ते जुलै 2015 या दरम्यान लाभार्थ्यांना पिठाची गिरण प्राप्त झाल्या आहेत. ही बाब तसेच पंचायत समितींना पुरवठादाराकडून प्राप्त झाल्याचे दिनांक नोंदले नाहीत. त्यामुळे मुदतीनंतर प्राप्त झालेल्या मालाबाबत पुरवठा आदेश अट क्रमांक 8 नुसार दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहे. माल प्राप्त, वाटप व शिल्लक असा पंचायत समिती निहाय अहवाल घेतलेला नाही.

9) सदर योजना 90 टक्के अनुदानावर आहे. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग परिपत्रक क्रमांक पंरास/1084/सीआर/1633/578 दिनांक 19/01/1995 नुसार 10 टक्के लाभार्थी हिस्सा प्रथम वसूल करणे आवश्यक

आहे. तथापि तो वसुल न करताच पुरवठादारास 100 टक्के प्रदान केले आहे. सबब 10 टक्के प्रदान रक्कम रुपये 1,99,442/- वसुल करणे आवश्यक आहे.

10) पुरवठा आदेशातील वॉरंटी कालावधीतील पिठाची गिरणीबाबत पुरवठाधारक अटी शर्तीप्रमाणे कार्यवाही करत असलेबाबत पाठपुरावा केला नाही. पिठाच्या गिरणीमुळे महिलांना आर्थिक उत्पन्न मिळत असलेबाबत विनियोग तसेच कार्यव्ययी दाखले घेतले नाहीत. उद्दीष्टानुसार कार्यवाही झाली नसल्याने योजना सफल झाल्याचे प्रमाणीत होत नाही.

**3.865 सन 2014-2015 मधील शिलाई मशीन खरेदीच्या खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** सन 2014-15 मधील शिलाई मशीन खरेदीसाठी शासन अनुदान रक्कम रुपये 8,96,700/- व जिल्हा परिषद स्वीय निधी रक्कम रुपये 17,93,400/- असा एकूण रक्कम रुपये 26,90,100/- इतका खर्च महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक 13/08/2014 ठराव 62 व तांत्रिक व प्रशासकीय 1572/ 11/09/2014 तरतूद जिल्हा परिषद स्विय निधी 20,00,000/- शासन निधी 9,00,000/- मान्यतेने करण्यात आलेला आहे. तसेच पुरवठा आदेश- 277/183, दिनांक 11/02/2015 असा आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महिला व बालकल्याण विभागाने मशीन खरेदी पोटी जिल्हा परिषद स्वीय निधी तून 294 नग दर रुपये 6,100/- प्रमाणे रक्कम रुपये 1,79,340/- प्रत्यक्षात होत असताना आकस्मिक खर्चाच्या बिलावरील चुकीची परिगणना करून कमी रकमेचे बिल नोंदवून रुपये 1,69,340/- ची तफावत दर्शविलेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 79 नुसार देयक पारीत करताना जिल्हा परिषद वित्त विभागाची पडताळणी केलेबाबत प्रमाणपत्र जोडलेले आहे. परंतु चुकीची परिगणना केल्याने वित्त विभागाने नियमाचे उल्लंघन करून अनियमितता केली आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय झेडपीए 2008/ प्र.क्रमांक446, दिनांक 20/06/2008 नुसार निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविली नसल्यामुळे लाभार्थ्यांना विहीत कालावधीत लाभ मिळू शकला नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय झेडपीए 2013/ प्र.क्र.76/ परा 1, दिनांक 24/01/2014 मधील अनुक्रमांक 16 प्रमाणे महिलांना विविध साहित्य पुरवणे या सदराखाली शिलाई मशीन खरेदी केलेली आहे. प्रत्येक लाभार्थीचा 10 टक्के सहभाग घेणे व जमा होणाऱ्या लाभार्थी हिस्स्यामधून साहित्य खरेदी करता येईल असे असताना 100 टक्के रक्कम पारित केलेली आहे त्यामुळे रुपये 2,69,010/- रकमेचे अतिप्रदान झाले आहे. याबाबत स्पष्टीकरण करून रक्कम वसुलात आणावी. प्राधान्याने दारिद्र रेषेखालील पात्र लाभार्थींना लाभ देणे बंधनकारक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. पुरेसे लाभार्थी दारिद्रय रेषेखालील न सापडल्यास 50 हजार पर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या अन्य महिलांना महिला व बालकल्याण समितीच्या मान्यतेने सदर योजनेचा लाभ दिल्याबाबतचे लेखे उपलब्ध झाले नाहीत.

4) शिलाई मशीनची नस्ती पडताळणी करता दिनांक 05/11/2014 ई-निविदा प्राप्त कागदपत्राची तुलनात्मक दर पत्रकावरून जिनेश्वर सप्लायर्स बीड यांची निविदा पात्र म्हणून स्वीकृत केलेली होती. त्यामध्ये शिलाई मशीनचा दर रक्कम रुपये 3,430/- असा होता. परंतु दिनांक 23/12/2014 मुख्य कार्यकारी अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी बालकल्याण यांच्या आदेशानुसार सदर पुरवठादाराला अपात्र ठरवून अर्णव सप्लायर्स नांद्रे पुरवठादार यांची निविदा रुपये 6,100/- प्रमाणे मंजूर केलेली आहे. प्रत्यक्षात पात्र झालेल्या पुरवठादाराला निविदा दर कमी असताना संयुक्तिक कारणे न देता कोणत्या आधारे निविदा रद्द केली याचे स्पष्टीकरण द्यावे. अश्या कृतीमुळे कमी दराची निविदा मंजूर न करता जादा दराची निविदा स्वीकृत करून रक्कम रुपये 2,670/- जादा दराने दोन्हीही योजनेतून अदा झाली आहे. शासन निर्णय दिनांक 02/01/1992 निविदा प्रक्रिया, व ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांकपरांस 1096/प्र.क्रमांक-178/05 मुंबई,दिनांक 09/10/1997 नुसार व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील 142 नुसार (1 ते 3) प्रमाणे कोणत्याही निविदामध्ये बदल किंवा जादा दराची निविदा स्विकारण्यापूर्वी वित्त विभागाशी सल्ला मसलत करून तशी टिपणी मंजूर करून मुख्य लेखा व वित्त

अधिकारी यांची मंजूरी घेणे आवश्यक होते. परंतु तशी कार्यवाही न केल्याने जादा दराची निविदा स्विकारणे किंवा मंजूर करणे हे नियमबाह्य आहे. जादा अदाई दर रक्कम रुपये 2,670 प्रमाणे दोन्ही निधीतून शिलाई मशीन खरेदी नग 441 x 2670 = प्रमाणे होणारी रक्कम 11,77,470/- नुकसान झालेले आहे. याबाबत योग्य ती कागदपत्रे उपलब्ध करून नियमाप्रमाणे सर्व मंजुऱ्या घेतल्याचे प्रस्तुत करावे, अन्यथा जादा दराने अदा केलेली फरकाची रक्कम रुपये 11,77,470/- संबंधिताकडून वसुलात आणावी.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक, झेडपीए 2008/प्र.क्रमांक 4446/ वित्त 9 मंत्रालय मुंबई, दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ठ इ नुसार ठरवून कालमर्यादानुसार योजनेची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

6) लाभार्थींनी शिवण कामाचे प्रशिक्षण घेतलेचे उपयोगीता प्रमाणपत्र उपलब्ध करण्यात आलेले नाही.

7) शासन दरकरार नसल्याबाबत योग्य ते लेखे उपलब्ध नाही त्यामुळे विहीत दर करारानुसार खरेदी प्रक्रिया न राबविता निविदा पद्धतीने खरेदी केल्याने शासन निर्णयाचे उल्लंघन झाले आहे.

8) पुरवठादाराने पुरविलेल्या शिलाई मशीन Specification नुसार असल्याचे चाचणी तपासणी अहवाल घेण्यात आला नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम कलम 128 नुसार मालमत्ता संपादनास सक्षम अधिकाऱ्याची मंजुरी घेतली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 4 खालील परिशिष्ठ 2 नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या मंजुरीची माहिती स्थायी समिती / विषय समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर केलेली नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पिआरसी 1020/प्र.क्र.14/38, दिनांक 09/07/2001 नुसार खरेदी पूर्वी लाभार्थ्यांची निवड केलेची कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत व त्याचप्रमाणे महिला व बालकल्याण समिती यांनी दोन्ही निधीतून लाभार्थी निवड केलेली अंतिम यादी प्रस्तुत केलेली नाही.मास्टर नोंदवही नसल्यामुळे दिलेल्या लाभार्थींना लाभ दुबार झाला असल्याचे शक्यता नाकारता येत नाही. तरी दुबार लाभ झालेल्या लाभार्थींची वसुली करणे आवश्यक आहे.

9) 441 शिलाई मशीन ताब्यात मिळाल्याबाबत साठा नोंदवहीत नोंदवून वितरीत केल्याबाबत साठा नोंदवह्या लेखापरीक्षणास मागणी करूनही प्राप्त झाल्या नाहीत. त्यामुळे साहित्य योग्य त्या रीतीने प्राप्त झालेबाबत लेखे सादर करावे.

**3.866 ग्रामीण भागातील किशोरवयीन मुलींना, महिलांना जेंडर, आरोग्य, कुटूंब नियोजन, कायदेविषयक प्रशिक्षण.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** ग्रामीण भागातील किशोरवयीन मुलींना जेंडर, आरोग्य कुटूंब नियोजन, कायदेविषयक प्रशिक्षाकरीता वित्तप्रेषणाने 16 प्रकल्पांना रक्कम रुपये 3,50,000/- वितरीत व जिल्हा परिषद स्तरावर रक्कम रुपये 87,240/- असे एकूण रक्कम रुपये 4,37,240/- च्या खर्चाबाबत खालीप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महिलांना कायदेविषयक मार्गदर्शनासाठी कोणत्या कायदेतज्ञाचे मार्गदर्शन घेतले याची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग झेडपीए 2013/प्र.क्र.76/परा-1,दिनांक 21/03/2014 मधील अनुक्रमांक 6 नुसार सदरचा खर्च कायदेविषयक प्रशिक्षणासाठी खर्च करणे असताना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क) यांचे आदेश क्रमांक जा.क्र.जिप/मबाक/कावि/2/ जा.म.दिनांक 11/03/2015 च्या आदेशान्वये अंगणवाडी सेविकांच्या पुरस्कार कार्यक्रमासाठी कलेला खर्च रक्कम रुपये 87,240/- वसूलपात्र होणे आवश्यक आहे.

3) मिडास ग्राफिक्स, कोल्हापूर यांना प्रमाणपत्र, निमंत्रण पत्रिका छपाई, सन्मान व स्मृती चिन्ह या बाबीसाठी रक्कम रुपये 49,640/- खर्च केला आहे तथापि सदर रकमेतून 2 टक्के आयकर रक्कम रुपये 992/- कपात केलेला नाही.

**3.867 ग्रामीण भागातील महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** ग्रामीण भागातील महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणेकरिता रक्कम रुपये 17,59,808/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर प्रशिक्षण कालावधी दिनांक 26/02/2015 ते 31/03/2015 असा 30 दिवसांचा होता. सदर कालावधी मधील 5 दिवस रविवार शासकीय सुट्टी वगळता सदर प्रशिक्षण 29 दिवसांचे झाल्याने 1 दिवसाचे प्रती प्रशिक्षणार्थी 30 रुपये प्रमाणे 1954 लाभार्थ्यांचे 58,660/- एवढी रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

2) प्रशिक्षणार्थीची शैक्षणिक पात्रता व गुणवत्तेची प्रमाणपत्रे उपलब्ध नाहीत त्यामुळे प्रशिक्षणासाठी लाभार्थी निवड कोणत्या निकषावर करण्यात आली हे स्पष्ट होत नाही.

3) महाराष्ट्र ॲडव्हान्स ट्रेनिंग सेंटर कोल्हापूर यांची सदर प्रशिक्षणासाठी 'ई' निविदेद्वारे निवड केली आहे. सदर संस्थेची नोंदणी सहाय्यक संस्था निबंधक, कोल्हापूर यांचेकडे दिनांक 27/07/1998 रोजी केले आहे परंतू नुतनीकरण अद्याप केलेले नाही. कालबाह्य नोंदणी झालेल्या संस्थेस काम देवून प्रक्रियेमध्ये अनियमितता केली आहे.

4) पुरवठा आदेशानुसार बाल विकास प्रकल्प अधिकारी व पर्यवेक्षिका यांनी प्रत्येक आठवड्यात किमान एकदा प्रत्यक्ष भेट देणे असताना तशी कार्यवाही नाही.

5) सदर योजनेचा लाभार्थ्यांना लाभ झालेबाबत फलश्रुती अहवाल उपलब्ध करुन दिला नाही.

**3.868 अंगणवाडयांना विविध साहित्य पुरवणे.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** शासन दरकरानुसार दिनांक 04/03/2015 अन्वये साई हायटेक प्रो.मांजरी पुणे यांचेकडून जिल्हा परिषद सेस मधुन एकूण 283 नग वजनकाटे खरेदी करण्यात आली त्याकरिता जिल्हा परिषद सेस मधुन रक्कम रुपये 24,96,060/- इतका खर्च केलेला आहे.

1) मे साई हायटेक प्रो.मांजरी पुणे यांना वजनकाटे पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आलेले होते. वजनकाटे वापराबाबत प्रशिक्षण संस्थेने दिल्याचे प्रकल्प स्तरावरुन प्रत्येक तालुक्याने कळविले असून त्यामध्ये प्रशिक्षितांचे उपस्थिती अहवाल जोडलेला नाही. वजनकाटे वापराबाबत प्रशिक्षण झाले किंवा नाही याची खात्री करता आली नाही.

2) सदर वजनकाटे खरेदीची 90 टक्के रक्कम रुपये 21,96,533/- इतकी रक्कम तसेच वॅट, इन्कमटॅक्सची रक्कम रुपये 49,921/- मिळून 24,96,060/- इतकी रक्कम दिली असून अटी व शर्तीनुसार अट क्रमांक 5 नुसार Director Quality Assurance आयकर भवन अनेक्सी 1 ला मजला न्यू मरीन लाईन मुंबई 20. यांचे सदर वजनकाटे पुरवठा शासन दर करारात नमूद केल्याप्रमाणे विहित दर्जाचे असल्याचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. सोबत अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग वैधमापनशास्त्र यंत्रणा पुणे यांचे प्रमाणपत्र सोबत जोडले असून दिलेल्या अटी व शर्तीनुसार ते ग्राहय धरले जाता येत नाही.

3) Govt. of India Director of Supplies & Dispcsas Shastri Bhawan 26 Haddows Road Chennai- 600006 Amendment No-EFGMICH-2/RC-CC020000/0315/259 NC043/096/52048 Dated-29 Sept.14 EFEective Date 25/09/2014 या आरसी वर स्वाक्षरी नाही.

**3.869 महिला व बालकल्याण विभागाकडून पंचायत समितींना प्राप्त झालेल्या व शिल्लक साहित्याबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास 1096/प्र.क्र.178/ 85,दिनांक 09/01/1997 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/ वित्त 9,दिनांक 20/06/2008 नुसार एखादया कल्याणकारी योजनेंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या साहित्याचे वाटप त्याच आर्थिक वर्षात होणे आवश्यक आहे. तथापि विभागाने खरेदी केलेल्या साहित्यापैकी एकूण रुपये 27,81,726/- इतक्या रकमेचे साहित्य पंचायत समिती स्तरावर वाटपाअभावी पडून आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त 9,दिनांक 20/06/2008 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनेसाठी प्रभावी अंमलबजावणी व नियोजन विशिष्ट मुदतीत होण्यासाठी दिलेल्या कार्यक्रमपत्रिके नुसार कार्यवाही करणेबाबत सूचित केले असतानाही त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. साहित्य वाटप 30 नोव्हेंबरपूर्वी करणे आवश्यक असताना साहित्य प्राप्त मार्च महिन्यात व वाटप पूढील आर्थिक वर्षात ही अनियमितता आहे.

**3.870 ग्रामीण भागातील महिला व मुलींना तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण देणे अंतर्गत ॲडव्हान्स ब्युटीपार्लर व फॅशन डिझायनिंगचे प्रशिक्षण देणे. (गट अ.)**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** ग्रामीण भागातील महिला व मुलींना तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण देणे योजनेसाठी रक्कम रुपये 30,50,000/- इतका खर्च करण्यात आलेला आहे.

1) प्रशिक्षण आदेशातील अट क्रमांक 1 नुसार निवड करण्यात येणा-या लाभार्थीनींपैकी 3 टक्के अपंग लाभार्थीनींची निवड केलेली नाही.

2) सदर योजनेवर मोठया प्रमाणात खर्च झाला असून उदयोग विकास व उदयोजकता विभागाच्या शासन निर्णयानुसार जाहिर निविदा प्रसिध्दीची कार्यवाही झालेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1094/सीआर/2239/34/67, दिनांक 01/09/1993 नुसार एकाच कुटूंबात दूबार लाभ दिला जाणार नाही, असे नमूद असताना मंजूर यादीची तपासणी केली असता एकाच कुटूंबातील 2 व्यक्तींना दुबार लाभ अदा केला आहे. त्यामुळे नियमबाहय झालेल्या प्रशिक्षणापोटी जादा अदा झालेली खर्च रक्कम रुपये 24,000/- वसूल करणे आवश्यक आहे.

**3.871 ग्रामीण भागातील महिला व मुलींना तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण देणे अंतर्गत संगणक प्रशिक्षण देणे (MSCIT). (गट अ.)**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** ग्रामीण भागातील महिला व मुलींना तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण देणे योजनेसाठी रक्कम रुपये 9,49,000/- इतका खर्च करण्यात आलेला आहे.

1) प्रशिक्षण आदेशातील अट क्रमांक 1 नुसार निवड करण्यात येणा-या लाभार्थीनींपैकी 3 टक्के अपंग लाभार्थीनींची निवड केलेली नाही.

2) सदर योजने रक्कम रुपये 9,49,000/- इतका खर्च झाला असून उदयोग विकास व उदयोजकता विभागाच्या दिनांक 02/01/1992 च्या शासन निर्णयानुसार जाहिर निविदा प्रसिध्दीची कार्यवाही झालेली नाही.

3) प्रशिक्षण आदेश क्रमांक 311,दिनांक 17/11/2014 मधील अट क्रमांक 1 नुसार लाभार्थी हा ग्रामीण भागातील रहिवासी असावी,असे असताना नमूद लाभार्थीनींचे प्रस्तावास रहिवासी दाखला जोडलेला नसल्याने त्या ग्रामीण भागातील रहिवासी असल्याचे स्पष्ट होत नाही.

4) मंजूर लाभार्थी यादया पाहता नमूद प्रशिक्षणार्थींची नांवे दुबार आहेत, त्यामुळे दुबार लाभ अदा केल्यापोटी जादा अदा रक्कम रुपये 6,500/- वसुलात आणून पुर्तता सादर करावी.

5) सदर योजनेचे प्रस्ताव पाहता काही प्रस्तावांसोबत MSCIT Application Form च्या छायांकित प्रती जोडल्या असून त्यावर बॅच महिना व वर्ष जुलै 2013 असे नमूद आहे. तरी मुळ ॲप्लीकेशन फॉर्म व उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर करुन पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

**3.872 ग्रामीण भागातील महिलाना 90 टक्के अनुदानावर पिको फॉल शिलाई मशिन पुरविणेबाबत. (सर्वसाधारण, अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती) (सेसफंड)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** महिला व बालकल्याण विभागाने 90 टक्के अनुदानावर पिको फॉल शिलाई मशिन पुरविणे वर रक्कम रुपये 51,63,732/- खर्च केले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013 /प्र.क्र. 76 /पंरा 1, दिनांक 24 जानेवारी 2014 मधील परिच्छेद 16 अन्वंये योजनेच्या अंमलबजावणी करीता योग्य लाभार्थी मिळवण्याच्या उद्देशाने पुरेशी प्रसिध्दी देवून दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील पात्र महिलांना प्राधान्य क्रमाने लाभ देण्यात यावा असे लाभार्थी उपलब्ध नसल्यास रुपये 50,000/- रुपये पर्यत वार्षीक उत्पन्न असलेल्या अन्य महिला लाभार्थींना समितीच्या मान्यतेने लाभ देण्यात यावा असे नमुद आहे. परंतु याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र.41 /33 , दिनांक 17 जानेवारी 2001 मधील तरतुदीनुसार मुख्यं लेखा व वित्तं अधिकारी यांचेशी विचार विनिमय न करता खाजगी कंपनी कडुन 547 प्रतिनग शासन दरकरारापेक्षा जादा दराने खरेदी केल्याने रूपये 4,74,796/- चे नुकसान झाले आहे.

3) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008 वित्तं 9, दिनांक 20 जुन 2008 परिशिष्ट ई नुसार वैयक्तीक लाभाच्या योजना वेळापत्रकानुसार राबविल्या नसल्यामुळे लेखापरीक्षण दिनांक पर्यत 3 पिको फॉल मशिन शिल्लक राहिल्या आहेत.

4) लाभार्थी हिस्सा साहित्य वाटपानंतर वसुल केला आहे एकुण 868 लाभार्थीचे रुपये 5,16,478/- लाभार्थी हिस्सा पैकी किती रक्कंम जमा झाली या बाबत अभिलेखे लेखापरीक्षणास सादर केले नाही.

5) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 सी नुसार विविध कपाती 100% रक्कमेवर न करता 90% रक्कमेवर केल्या आहे व उर्वरीत 10 टक्के रक्कमेवरील कपाती रुपये 1,46,608/- कपात करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

6) बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी डिलेव्हरी चलान मध्ये पिको फॅको मशिन प्राप्त झाल्याचे दिनांक दाखविणे आवश्यक होते.

7) देयकाची रक्कम रुपये 51,63,732/- असल्याने सुरक्षा ठेव 5 टक्के रुपये 2,58,187/- कपात करणे आवश्यक असतांनी रूपये 1 लाख कपात करुन नियमाप्रमाणे कार्यवाही केली नाही.

8) मुद्राक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 परिशिष्ट 1 अनुच्छेद 6 नुसार करारनामा रुपये 4,200/- चे मुद्रांकावर न करता रुपये 3,500/- चे मुद्रांकावर केल्याने रुपये 700/- महसुलाचे नुकसान झाले आहे.

9) पंचायत समिती चांदूर रेल्वे व नांदगाव खंडेश्वर अनुसूचीत जातीसाठीच्या योजनेमध्ये अनुसूचीत जमातीच्या लाभार्थ्यांना लाभ दिला आहे.

**3.873 10 वी व 12 वी पास मुलींकरीता संगणक प्रशिक्षण देणेबाबत. (जिल्हानिधी / शासकीयनिधी)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** महिला व बालकल्याण विभागने 10 वी व 12 वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण देणे या योजनेवर सन 2014-2015 मध्ये रुपये 30,59,969/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षण महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित मुंबई यांचे अधिकृत प्रशिक्षण केंद्रांमार्फत चालते.परंतु करियर अँड टेक्नॉकल इंस्टीटयुट,दर्यापूर हे अधिकृत प्रशिक्षण केंद्र असल्याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास सादर केले नाही.

2) करियर कॉम्पुटर अँड टेक्नॉकल इंस्टीटयुट,दर्यापूर यांनी तालुका स्तरावरील संस्थेच्या नावासह हमीपत्र व यादी दिली नाही त्यामुळे संपुर्ण जिल्हयात 1331 लाभार्थींना प्रशिक्षण देण्याची संस्थेची क्षमता असल्याची खात्री पटत नाही.

3) निवड केलेल्या लाभार्थ्यांना कोणत्या प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण दिले याबाबतची माहिती लेखापरीक्षणास सादर केली नाही.

4) प्रशिक्षण झालेल्या मुलींमधून किती मुली उत्तीर्ण झाल्या याबाबतचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास सादर केले नाही.

5) प्रशिक्षण कोणत्या कालावधीत झाले याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास सादर केले नाही.

6) आयकर अधिनियत 1961 चे कलम 194 सी नुसार 2 टक्के आयकर कपात केली नाही.

7) देयकामधून सुरक्षा ठेव कपात केली नाही.

**3.874 90% सुटवर सौदर्य प्रसाधनाचे प्रशिक्षण दिलेल्या खर्चाबाबत. (जिल्हा निधी/शासकीय निधी)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** सन 2014-2015 या लेखापरिक्षण वित्तीय वर्षात 90% सुटीवर सौदर्य प्रसाधनाचे प्रशिक्षणावर रक्कम रुपये 4,51,350/- खर्च केले याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) श्री बहुउद्देशीय संस्था, रहाटगाव, अमरावती यांनी दिनांक 14/02/2013 करारनामा केल्यानंतर 236 लाभार्थ्यांचे अर्ज व लाभार्थी हिस्सा प्राप्त न करता रक्कम रुपये 4,51,350/- अदा केले. लाभार्थी हिस्सा रक्कम रुपये 1,00,300/- लेखापरिक्षण दिनांकापर्यंत निधीत जमा झाल्याबाबतचे चलान उपलब्ध केले नाही.

2) सलग्न संस्थेने लाभार्थ्यांना दिलेल्या प्रवेश अर्जावर सलग्न संस्थेच्या सहया, मुली/महिलांचे हजेरीपट व उपस्थितीची टक्केवारी महिनानिहाय अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाही.

3) संस्था अधिकृत शासन मान्य असल्याबाबत रजिस्टर नोंदणी क्रमांक नोंदविले नाही.

4) श्री बहुउद्देशीय संस्था,रहाटगाव,अमरावती यांनी पंचायत समिती स्तरावर प्रशिक्षण सलग्न संस्था, सुकेशनी बहुउद्देशीय संस्था, धारणी,श्री महाविर विज्ञान संस्था नेरपिंगळाई, रोषणी महिला विकास संस्था अंजनगाव सुर्जी व महाविर शिक्षण संस्था नेरपिंगळाई यांचेशी केलेले करारनामे,मुलांचे हजेरीवर तपासणी अधिकाऱ्याचे शेरे नाही व संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र उपलब्ध केले नाही.

5) संबधित अधिकाऱ्यांनी प्रत्येक संस्थेला भेटी देवून उपस्थितीची तपासणी केल्याचे उपस्थिती अहवाल प्राप्तं झाले नाही.

6) अपंग व्यक्ती हक्कांचे सरक्षण अधिनियम 1995 अन्वये अपंगासाठी 3% राखुन ठेवणे बंधनकारक असून योजनेचा लाभ देणे आवश्यंक होते नियमबाहयते बाबत खुलासा करावा.

**3.875 90% अनुदानावर मुलींना, महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे अंतर्गत फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण देणे. (जिल्हा निधी/सेसफंड निधी)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छे क्रमांक 4) -** सन 2014-2015 या लेखापरीक्षण वित्तीय वर्षात सदर योजनेतंर्गत सुधारीत तरतुद रक्कम रुपये 22,47,000/- मधुन रक्कम रुपये 8,73,180/- खर्च केले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र. 446/ वित्त 9, दिनांक 20 जुन 2008 मधील परिच्छेद 3 अन्वये योजनेचे अंमलबजावणी विशिष्ट कालावधीत करणे बाबत वेळापत्रक दिले असून त्या मुदतीत पार पाडल्या नाही त्यामुळे योजना अपुर्ण असुन लाभार्थी योजनेपासून वंचित राहिले नसते.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक झेडपीए 2009/प्र.क्र.498/ वित्तं 9, दिनांक 12 ऑगस्ट 2009 नुसार वित्तीय शिस्तिचे पालन करणेसंबधी आदेश असून त्याला अनुसरुन कार्यवाही करणे अनिवार्य असतांना अंदाजपत्रकीय तरतुदीला अनुसरुन खर्च करतेवेळी केली नाही.

3) लाभार्थी हिस्सा जमा करुन योजना राबविणेबाबत निर्देश असतांना प्रशिक्षणपुर्ती 722 लाभार्थ्यांचा लाभार्थी हिस्सा रुपये 2,38,260/- वसूल करण्यात आला नाही. वसुली रकमेबाबतचे अभिलेखे लेखापरिक्षणास सादर केले नाही.

4) आयकर आधारित 1961 चे कलम 194 सी नुसार 2 % आयकर रुपये 47,652/-, 2% मुल्यंवर्धित कर रुपये 47,652/- व 3% सरचार्ज रुपये 1,430/- कपात करुन शासनास भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

5) सुरक्षा ठेव 5% रुपये 1,19,130/- कपात करणे आवश्यक असतांना रुपये 1 लाख रक्कम कपात करुन नियमाला अनुसरुन कार्यवाही केली नाही.

6) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 कलम 34 परिशिष्ट 1 चे अनुच्छेद 6 नुसार रुपये 23,82,600/- साठी 1,500/- रुपये चे मुद्रांक पेपरवर करारनामा न करता रुपये 600/- चे मुद्रांक शुल्कावर करारनामा केला. त्यामुळे उर्वरित रक्कम 900/- वसुल करावी.

7) 8 संस्थाचे 266 लाभार्थ्यांपैकी 3 संस्थाचे 93 लाभार्थी अर्ज उलब्ध केले नाही.

**3.876 5 वी ते 10 वी पर्यंत शिकणाऱ्या मुलींना लेडीज सायकल पुरविणे योजनेतील आर्थिक अनियमितता. (जिल्हा निधी/राज्य शासननिधी)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** सन 2014-2015 महिला व बालकल्याण विभागाने या लेखापरिक्षण वित्तीय वर्षात 5 वी ते 10 वी पर्यंत शिकणाऱ्या मुलींना लेडीज सायकल पुरविणे योजनेवर रुपये 34,01,585/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2010/अनौसंक्रं-33/प्र.क्र.168/पंरा-1, दिनांक 10 मार्च 2011 तथा शासन शुध्दीपत्रक दिनांक 22 जुलै 2011 मधील परिच्छेद 4 मध्ये नमुद केल्याप्रमाणे ज्या मुली वर्ग 5 वी ते 10 वी पर्यंत बाहेरगावी शिकतात व अंतर 2 किलोमिटर पेक्षा जास्त आहे. अशा मुलींची शाळा व्यवस्थानाकडून यादी मागवून त्याला अनुसरुन यादी निश्तिच करुन खरेदीची कार्यवाही करणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यवाही न केल्याने नियमाला अनुसरुन केली नाही. पात्र लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिले.

2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20 जुन 2008 नुसार दिलेल्या वेळापत्रकानुसार कार्यवाही केली नाही, त्यामुळे लेखापरिक्षण तारखेपर्यंत 188 सायकली शिल्लक राहिल्या.

3) जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरील यादया पदाधिकारी यांनी सादर करुन उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) यांनी सदरच्या लाभार्थी यादया पंचायत समिती स्तरावर पाठवून त्यांना लाभ देण्याचे आदेशीत केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे परिशिष्ट 4 मधील आर्दश वित्तीय सुत्रांचा भंग झाला आहे.त्याप्रमाणे पात्र मुली लाभापासून वंचीत राहिल्याचे दिसून येते.

4) पुरवठाधारक हिरो सायकल कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्याबाबत दस्तऐवज लेखापरिक्षणात मिळाले नाही.

5) अर्जाची तपासणी केली असता कु.जान्हवी रविंद्र घोरे, हिरुळपुर्णा सन 2014-2015 मध्ये वर्ग 7 वी शिवाजी मल्टीपर्पज हायर सेकंडरी स्कुल शिवाजी नगर,अमरावती येथे शिकत असून अंतर 35 कि.मी. पेक्षा जास्त असल्याने सायकलने जाणेयेणे शक्य नाही असे असतानी लाभ देण्यात आला. त्याचप्रमाणे अंजनगाव सुर्जी व भातकुली पंचायत समित्यांनी पात्र लाभार्थ्यांना लाभ न देता वेगळया प्रवर्गातील लाभार्थ्यांना लाभ दिला.

6) शासन दरकरारानुसार सायकल खरेदी करण्यात आलेली नाही. 2 टक्के व्हॅट रुपये 69,635/- आयकर रुपये 69,637/- व उपकर रुपये 2,089/- असे एकुण रक्कम रुपये 1,41,363/- देयकाच्या रकमेतून कपात करुन शासन खाती भरणा केला नाही.

**3.877 जिल्हा निधी मधुन ग्रामिण महिलांना 90% अनुदानावर पिको फॉल शिलाई मशिन पुरविणे खर्चातील अनियमिततेबाबत. (जिल्हा निधी/राज्य शासननिधी)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** सन 2014-2015 मध्ये जिल्हानिधी अनुदानामधुन प्रमाणक क्रमांक 1575 दिनांक 31/03/2015 रक्कम रुपये 17,85,867/- (कपात 40409) श्रीकृष्ण सेल्स अहमदनगर यांचे देयक क्रमांक 79 दिनांक 25/03/2015 अन्वये ग्रामिण महिलांना 361 शिलाई मशिनचे नग पुरविण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन आदेशाप्रमाणे लाभार्थी निवड केली नसल्यामुळे 18 शिलाई मशिन पंचायत समिती स्तरावर लेखापरिक्षण तारखेपर्यंत शिल्लक राहिलेल्या आहेत. कार्यालयीन कार्यपध्दती नियमाला अनुसरुन 14 पंचायत समिती स्तरावर लाभार्थी अर्ज आवक केले नाहीत.

पंचायत समिती चिखलदरा येथील साठा रजिस्टरची पडताळणी केली असता साठा रजिस्टर कार्यालय प्रमुखांनी प्रमाणित केले नाहीत.

पंचायत समिती स्तवरावर अभिलेखे लाभार्थ्यांच्या अर्जाची पडताळणी केली असतांना वैयक्तिक लाभाच्या वेळापत्रकाला अनुसरुन योजनेसंबधी निवड प्रक्रिया न करताच खरेदी प्रक्रिया केल्याने शिलाई मशिन शिल्लकं राहिलेल्या आहेत.

2) योजनेचा लाभ याआधी लाभार्थ्याला दिलेला नसावा याबाबतचे गटविकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र अर्जासोबत उपलब्ध केले नाहीत. ग्रामसभेतुन अर्ज मंजुरीचा ठराव नसतांना अर्ज प्राप्त झालेले आहेत. 10% लाभार्थी चलान पिकोशिलाई मशिन दिल्यानंतर घेण्यात आली. त्यामुळे पहिले लाभार्थी हिस्सा घेवूनच योजना राबविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

3) खरेदी रकमेचे प्रदान करतांना आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 सी नुसार 2% रुपये 36,525/-, 2% व्हॅट रुपये 36,525/-, 3% शिक्षण उपकर रुपये 1,096/- असे एकुण रुपये 74,146/- देयकाच्या रक्कमेतुन कपात केलेल्या नाहीत. सदर रक्कमा शासनखाती भरणा करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**3.878 अनुसुचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्याला अतिरिक्त पौष्टीक आहार योजना 2014-15 कुपोषित मुला मुलीं करीता तसेच स्तनदा माता गरोदर स्त्रिया यांना अतिरीक्त पौष्टीक आहार पुरविणे बाबतची अनियमितता.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** अनुसुचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्याला अतिरिक्त पौष्टीक आहार योजना 2014-15 कुपोषित मुला मुलीं करीता तसेच स्तनदा माता गरोदर स्त्रिया यांना अतिरीक्त पौष्टीक आहार पुरविणे योजनेमध्ये खालीलप्रमाणे अनियमितता आढळतात.

1) अनुसुचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना अतिरिक्त पौष्टीक आहार योजना सन 2014-15 मध्ये कुपोषित मुला मुलींकरिता तसेच स्तनदा माता गरोदर स्त्रिया यांना अतिरिक्त पौष्टीक आहार वितरीत केल्याचे दिसते परंतू वाटप संख्या योग्य नसल्याचे आढळते.

2) प्रकल्पनिहाय मागणी लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

3) डिलीवरी चलाना वर नमुद नग नुसार रक्कम प्रदानाची खात्री झाली नाही त्यामुळे जादा रक्कम प्रदानाची शक्यता आहे.

4) पुरवठा आदेश दिल्यानंतर विहीत मुदतीत पुरवठा न केल्याबाबत दंड आकारणी करण्यात आला नाही. सदर बिल 2013-14 ला प्राप्त असतांना पुरवठा आदेश विलंबाने दिनांक 19/12/2014 ला देण्यात आले. योजना राबविणेबाबत आर. सी. मार्च 2012 ते नोव्हेंबर 12 पर्यंत आहे योजना विहित कालावधीत राबविण्यात आली नाही.

5) सुरवातीला सुरक्षा ठेव न ठेवता देयकातून वजा करण्यात आली.

6) दरपत्रकातील अटीनुसार 90 टक्के ऐवजी 100 टक्के रक्कम प्रदान केली.

7) लाभार्थींची यादी निश्चित करून मान्यता घेतल्याबाबत विषय समितीचा ठराव उपलब्ध झाला नाही.

8) चाचणी अहवालात वीटामीन बी 12 कमी असल्याचे आढळले.

9) 40 ग्राम चिक्की देणे अनुज्ञेय असतांना 48 ग्राम कशाचे आधारे निश्चित केली अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत.

10) प्रकल्पनिहाय साठा पुस्तके उपलब्ध झाले नाहीत.

11) लाभार्थ्यांना साहित्य मिळाल्याच्या पोच पावत्या उपलब्ध झाल्या नाहीत.

12) खर्च नोंदवही, उपयोगिता प्रमाणपत्र,पूर्णत्वाचे दाखले,खर्चाचा ताळमेळ,विनियोग नस्ती इत्यादी आवश्यक अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

**3.879 प्रलंबित अग्रिमाबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** सन 2009-10 ते 2013-14 या कालावधीतील प्रलंबित अग्रीम नोंदवहीची पडताळणी केली असता देण्यात आलेला अग्रीम रुपये 4,74,920/- लेखापरिक्षण कालावधीपर्यंत प्रलंबित असल्याचे निदर्शनास येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त-9/ मंत्रालय मुंबई दिनांक 20/06/2008 ला अनुसरुन विशिष्ट मुदतीत व दिलेल्या कालावधीनुसार अंमलबजावणी करावयाची असल्याने अग्रिम प्रलंबित राहण्याचा प्रश्नच उदभवत नाही. याबाबत निष्क्रियता असल्याचे आढळून येते.

2) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 1007/प्र.क्र.62/ कोषा प्र.5 दिनांक 07/04/2008 नुसार प्रदाने ईसीएस, एमईएफटी किंवा रोखीत धनादेशाव्दारे करणे अनिवार्य असतांना मोठया प्रमाणात अग्रिम देवुन वेळीच समायोजन न करणे म्हणजे शासकीय रक्कमा बाहेर ठेवून तात्पुरता अपहार करणे होय.

3) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन यांचे पत्र क्रमांक झेडपीए 2009/प्र.क्र.498/वित्त-9/मंत्रालय मुंबई दिनांक 12/08/2009 नुसार वित्तीय शिस्तीचे पालन करणे संबंधी अनुक्रमांक 42 व अग्रिमाच्या वसुलीचा आढावा घेवुन अग्रिम समायोनाची कार्यवाही करणे बाबत आदेशीत केले आहे. त्यानुसार कार्यवाही न झाल्यामुळे अग्रिमाच्या रक्कमा 5-6 वर्षापासून प्रलंबित आहे.

4) वरील प्रमाणे अग्रिमाचे समायोजन 5 ते 6 वर्षापासुन करण्यात आलेले नसल्यामुळे सदर अग्रिमाची रक्कम संबंधीत अधिकाऱ्याकडून वसुल करणे आवश्यक आहे.

**3.880 जिल्हा परिषद सेस फंडातुन 90 टक्के अनुदानावर महिलांना सौर कंदिल पुरविणे.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** जिल्हा परिषद सेस फंडातुन 90 टक्के अनुदानावर महिलांना सौर कंदिल पुरविणेबाबत प्रमाणक क्रमांक 676 दिनांक 31/03/2015 रुपये 24,48,684/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त-9/मंत्रालय मुंबई दिनांक 20/06/2008 नुसार परिशिष्ट इ मधील वेळापत्रकानुसार 31 मे पर्यंत लाभार्थ्यांची निवड करण्यात आली नाही. मंजुर केलेली एकत्रित यादी उपलब्ध करुन देण्यात आली नाही. 100 टक्के कंदिल वाटप करण्यात आले नाही. 64 नग शिल्लक राहील्याचे आढळून आले आहे.

2) पंचायत समिती स्तरावर प्राप्त अर्ज आवक केले नसल्याचे आढळून आले आहे.

3) शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2010/275/प्र.क्र.172/पंरा-7 मंत्रालय, मुंबई दिनांक 19/11/2011 नुसार ई-निविदा पध्दतीने योजना राबविणे बाबत विभागाने कार्यवाही करणे आवश्यक असतांना ई-निविदा प्रक्रीयेव्दारे खरेदी न करता 6 महिने नंतर दिनांक 03/03/2015 ला दरकरारानुसार पुरवठा आदेश निर्गमित केला आहे.

4) त्रिमुर्ती सोलर सिस्टिम प्रा.लि. पुणे यांनी श्री.दत्तविजय काशिनाथ लव्हाळे यांची बिजनेस असोसिएट म्हणून प्राधिकार पत्र दिले आहे. परंतु पत्रावर क्रमांक व दिनांक नमुद नाही. त्यामुळे खात्री होवु शकत नाही.

5) रुपये 500/- चा कोरा मुद्रांक स्टॅम्प पेपर जोडण्यात आला आहे. परंतु त्यावर करारनामा लिहण्यात आला नाही. तसेच मुद्रांक पेपर दिनांक 13/03/2015 चा आहे. परंतु पुरवठा आदेश दिनांक 03/03/2015 दिला आहे.

6) आकस्मिक खर्च नियम 1965 चे अनुसुची (2) व (3) नुसार प्रदानाकरीता उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, वाशिम यांनी आदेश निर्गमित केले नाही.

7) सौर कंदिलाचा पुरवठा जिल्हा स्तरावर प्राप्त झाले नाही. असे असतांना देयकावर सदर साहित्याची नोंद साठा नोंदवहीत घेण्यात आल्याचे प्रमाणपत्र नमुद केले आहे.

8) मागनी देयक कंपनीचे लेटरपॅडवर करण्यात आले असून मुल्यवर्धीत कर अधिनियम 2002 कलम 16 नुसार कार्यवाही केली नाही.

9) पंचायत समिती स्तरावर मागणी देयकानुसार साहित्य प्राप्त झाल्याबाबत चलान नंबर व वाहनाचा क्रमांक डिलीवरी चलानवर नाहीत. व वाहतूक करणाऱ्या परिवहन कंपनीच्या नावाचा उल्लेख डिलीवरी चालानवर नाही. डिलीवरी चलान विहीत नमुन्यात नसुन कंपनीचे लेटरपॅडवर चलान तयार करण्यात आले आहे.

10) प्रकल्प अधिकारी मंगरुळपीर यांना पाठविण्यात आलेली डिलीव्हरी चलानचा दिनांक व प्रत्यक्ष साहित्य प्राप्त झाल्याचा दिनांक यामध्ये तफावत असल्याचे दिसुन येते.

11) मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 मध्ये सुधारणा केल्याप्रमाणे परिशिष्ट 1 चे अनुच्छेद 63 नुसार 10 लाखापर्यंत रुपये 100/- व प्रत्येक पुढील 1 लाखाकरीता प्रत्येकी रुपये 100/- या प्रमाणे आवश्यक असतांनी रुपये 500/- च्या मुद्रांक शुल्कावर करारनामा केल्याने शासनाचे रुपये 1,300/- चे नुकसान झाले. सदरची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

12) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2007/प्र.क्र.4871/वित्त-3/मंत्रालय मुंबई दिनांक 05/10/2012 अन्वये अपंगाच्या कल्याण व पुर्नवसनाकरीता अपंग कल्याण कृती आराखडया नुसार 3 टक्के अपंग व्यक्तीकरीता अर्थसंकल्पीय तरतुद करुन योजना राबविणे आदेशित असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

13) लाभार्थी अर्जावर कार्यालयाचा आवक क्रमांक व दिनांक नमुद नाही. मालेगाव प्रकल्पांतर्गत वाटप करण्यात आलेल्या 3 लाभार्थ्यांच्या अर्जावर फोटो नाही. तसेच 8 अर्जदाराने तहसिलदाराचा उत्पन्नाचा दाखला अर्जासोबत जोडने आवश्यक असतांना तलाठयाचा दाखला जोडलेला आहे. तसेच 268 अर्जापैकी फक्त 238 अर्ज आढळून आले आहे. उर्वरीत 30 अर्ज प्राप्त न करता वाटप केलेले असल्यामुळे सदर 30 अर्जदारास वाटप केलेल्या सौर कंदिलाचा खर्च 30 X 2133 = 63,990/- रुपये लेखापरिक्षणास मान्य करता येत नाही. त्यामुळे सदरील रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

मंगरुळपीर प्रकल्पांतर्गत 120 सौर कंदिल पैकी 96 वाटप करण्यात आले असुन 24 सौर कंदिल शिल्लक आहे. वाटप केलेल्या 96 पैकी फक्त 44 अर्ज घेण्यात आले असुन उर्वरीत 52 अर्जदारास अर्ज सादर न करता वाटप केल्याचे दिसुन येते त्यामुळे 52 X 2133 = 1,10,916/- रुपये सदर खर्च वसुल करणे आवश्यक आहे. तसेच लाभार्थी हिस्स्याची रक्कम दिनांक 28/12/2015 ला भरणा केल्याचे दिसुन येते परंतु साहित्य लाभार्थी हिस्सा प्राप्त होण्यापुर्वीच वाटप केल्याचे दिसुन येते. उपरोक्त अभिप्रायावरुन सदर योजना रितसर राबविण्यात आली नसल्याचे दिसुन येते.

**3.881 वातानुकुलित यंत्रे खरेदीतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण कालावधीत उप.मुख्य कार्यकारी अधिकारी (म.बा.क.) यांनी वातानुकुलित यंत्र खरेदी करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक विअप्र-1008/प्र.क्र.70/ 2008/विनियम, दिनांक 15/05/2009 मधीलर अनुक्रमांक 18 नियम क्रमांक 68(ब) मधील अटी व शर्ती नुसार वातानुकुलीत यंत्र वरीष्ठ समयश्रेणीतील अधिकाऱ्यांसाठीच खरेदी करता येते. परंतु उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचे वेतनश्रेणीस वातानुकुलीत यंत्राचा वापर करणे अनुज्ञेय नसतांना खरेदी करण्यात आला आहे.

2) आकस्मिक खर्च नियम 1965 अनुसुची (2) व (3) नुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (म.बा.क) यांचे आदेश जा.क्र./जिपवा/एबावियेसो/आस्था 2/कावि 271/200 दिनांक 26/03/2015 नुसार खर्चास मंजुरी दिली आहे. परंतु संबंधित पुरवठा धारकाने देयक दिनांक 30/03/2015 ला सादर केले असतांना देयक प्राप्त होण्यापुर्वीच खर्चास मंजुरी प्रदान केली आहे.

3) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (म.बा.क) यांनी सुरक्षा ठेव / विक्रीकर कपात करुन प्रदानार्थ मंजुर म्हणून सही केल्याचे टिपणवरुन आढळून येत. परंतु पुरवठाधारकाच्या देयकातुन आयकराची रक्कम रुपये 780/-, विक्रीकर

रुपये 780/- अशी एकुण रुपये 1,576/- कपात करण्यात आली नाही. त्यामुळे सदर रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

4) वातानुकुलीत यंत्राची नोंद जंगम मालमत्ता नोंदवही वर घेणे आवश्यक असतांना नमुना 33 (सुटे भाग नोंदवही) पान क्रमांक 3 वर घेण्यात आली आहे.

**3.882 अंगणवाडी अंतर्गत गरोदर व स्तनदा मातांना अतिरीक्त आहार पुरविणे अंतर्गत पौष्टीक बिस्कीट खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** सन 2014-2015 या वित्तीय वर्षात महिला व बालकल्याण विभाग जिल्हा परीषद यवतमाळ जिल्हा परीषद सेस निधी अंतर्गत अंगणवाडी अंतर्गत गरोदर मातांना व स्तनदा मातांना अतिरीक्त आहार पुरविणे अंतर्गत 20 लाख रुपयाची तरतूद व मान्यता प्रदान करण्यात आली त्या अनुषंगाने रक्कम रुपये 14,99,999/- खर्च करण्यात आला असून वित्तीय वर्षात अखर्चीत रक्कम रुपये 5,00,001/- शिल्लक आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) गरोदर मातांची संख्या 18,488 असतांना गरोदर मातांना 1 पॅकेट बिस्कीट पुरवठा मागणी निश्चित असतांना 24,433 पॅकेट मागणी केली त्यामुळे 3,144 पॅकेट (दर 24.75/- प्रती पॅकेट) प्रमाणे रक्कम रुपये 77,814/- आवश्यकतेपेक्षा जादा मागणी करुन निधी खर्च करण्यात आला आहे.

2) प्रकल्पाअंतर्गत माहे मे-2014 मध्ये स्तनदा व गरोदर माता 38,047 इतक्या येत असल्याने आर्थीक दृष्टया कमकुवत नसतांना मातांना ज्या माता जिल्हा प्राथमिक आरोग्य कैंद्र व उपकैंद्र या व्यतिरीक्त औषधोपचार घेवू शकत नाही अशा निवडक मातांना 60 किवां 90 दिवसांचा कालावधीत वैद्यकीय देखरेखीखाली वजन व मापे रक्त नमुने घेवून आवश्यक असतांना स्तनदा व गरोदर मातांना या योजनेचा लाभ दिला असता पुर्वी घेतलेली वजन मापे त्या नंतर पुरक आहार अंतर्गत बिस्कीट पुरविण्यात आली नंतर शारीरीक मानसिक बदल झालेला अहवाल लेखापरीक्षणास प्राप्त झाला नाही. स्तनदा गरोदर मातेकडून पुरक आहार घेतल्यानंतर शारीरीक बदल मातेचे वैद्यकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही.

3) आर्थिकदुष्टया कमकुवत असणा-या स्तनदा व गरोदर मातांना योग्य निवड करुन अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका, वैद्यकीय अधिकारी यांच्या अधिनस्त मातांची निवड करुन त्यांना अंकुरीत उसळ, गुळपटटी, दुध, अंडी, केळी अशा प्रकारचा पुरक आहार 30 किंवा 60 दिवसाच्या कालावधीत दिला असता तर स्तनदा आणि गरोदर मातांना योग्य फायदा झाला असता योजनेची फलश्रृती योग्य पध्दतीने झाली असती.

**3.883 विशेष घटक योजने अंतर्गत वजन काटे खरेदीतील अनियमिततेबाबत**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** जिल्हा परिषद महिला बाल कल्याण विभाग येथील सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण कालावधीत 898 नग वजन काटे रुपये 3348.48 दरा प्रमाणे खरेदी करुन संबंधीत पंचायत समितीला पुरवठा करण्यात आला याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2011-2012 ते 2013-2014 या कालावधीत आयुक्त महीला बालकल्याण व महीला बालकल्याण विभाग जिल्हा परिषद बुलढाणा यांनी वजन काटे पुरविले आहे. त्याचा आढावा घेवुन मागणी नोंदविणे आवश्यक होते. परंतु तशी कार्यवाही केली नाही त्यामुळे एकाच कैंद्राला दुबार वजनकाटे प्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) एकात्मीक बालविकास प्रकल्प पंचायत समिती सिंदखेडराजा, नांदुरा, शेगाव, मलकापुर, लोणार यांना मागणी नसतांना प्रत्येकी 64 नग वजनकाटे पुरविण्यात आले त्यामुळे 320 वजनकाटे अनावश्यक खरेदी केली आहे.

3) महाराष्ट्र शासन वैद्यमापन शासन यंत्रणा धुळे यांचे अनुसुची नियम 2 नियम 16 नुसार आवश्यक तपासणी करण्यात आली नाही.

4) पुरवठा आदेश व करारनामा अट क्रमांक 1 नुसार उपमुख्य कार्यपालन अधिकारी (बालकल्याण) यांनी आवश्यक तपासणी केली नाही.

5) वजनकाटे चालविण्याबाबत प्रशिक्षण देणे बंधनकारक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

6) प्रकल्प जळगाव जामोद यांना जिल्हा परिषद सेस व विशेष घटक योजनेतुन 97 नग वजनकाटे दिनांक 17/10/2014 रोजी प्राप्त झाले व पान क्रमांक 27 वर सदर वजनकाटे पर्यवेक्षीकांना वाटप केले परंतु वजनकाटे मिळण्याबाबत स्वाक्षरी नोंदवहीत नाही.

**3.884 इयत्ता 5 वी ते 10 वी पर्यंत शिकणाऱ्या मुलींसाठी सायकल पुरविण्याबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** लेखापरिक्षण वर्ष 2014 - 2015 मध्ये जिल्हा परिषद नागपूर ने सेस फंड योजने अंतर्गत इयत्ता 5 ते 10 वी पर्यंत शिकणाऱ्या मुलींसाठी सायकल पूरविणे ही योजना राबविण्यात आली. योजनेस सक्षम प्राधिकाऱ्यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन में. जोधंळे पाटील अँड कंपनी, नाशिक यांना दिनांक 06/01/2014 नुसार व दिनांक 25/02/2014 नुसार 2,178 सायकली पुरविण्या बाबत आदेश देण्यात आला. त्यानुसार में. जोंधळे पाटील अँड कंपनी, नाशिक यांनी 13 पंचायत समितींना 2,178 सायकलींचा पुरवठा केलेला असून प्रमाणक क्रमांक 162, दिनांक 25/06/2014 द्वारे रूपये 62,98,128/- चे शोधन करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रकल्प स्तरावर साहित्य पुरवठा केलेल्या डी.एम.वर साहित्य प्राप्त झाल्याचा दिनांक नमुद केलेला नाही त्यामुळे साहित्य विहित कालावधीत प्राप्त झाले किंवा नाही याची खात्री करता आली नाही.

2) मास्टर नोंदवही ठेवण्यात आली नाही, त्यामुळे दुबार लाभ दिला गेला किंवा कसे याबाबत शहानिशा करता आली नाही.

3) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 तसेच नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांचे दिनांक 20/07/2009 मधील तरतुदी नुसार रूपये 10.00 लक्ष पर्यंत रूपये 100/- व रूपये 10.00 लाखाचे वर पुढील प्रत्येक 1 लाखांकरीता रुपये 100/- प्रमाणे करारनामा रूपये 6,100/- चे स्टॅम्प पेपरवर करणे आवश्यक असतांना फक्त रूपये 100/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा केला आहे. त्यामुळे शासनाचे रूपये 6000/- चे नुकसान झाले आहे. करारनाम्यावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण यांची स्वाक्षरी नाही.

**3.885 जादा दराने जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.**

**जिल्हा परीषद नागपूर, सन 2014-2015 (परीच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा परिषद नागपूर, महिला व बालकल्याण विभागामार्फत सन 2014-2015 या वर्षात विविध जिल्हा परीषद सेस फंड योजनाअंतर्गत जाहिराती करीता दैनिक वृत्तपत्रांना रुपये 29,600/- चे शोधन करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक जाहिरात 2009/ प्र.क्र.131/का.34,दिनांक 31/08/2009 नुसार दर ठरवून देण्यात आलेले असून त्यानुसार शासन जाहिरातीचा दर प्रती चौरस सें. मी. ला रूपये 25/- आहे. परंतु विभागाने जास्तीच्या दराने शोधन केलेले असून रुपये 6,800/- चा जास्तीचा खर्च केलेला आहे. त्यामुळे शासनाचे रुपये 6,800/- चे नुकसान झालेले आहे.

**3.886 महिला व बालकल्याण समितीचा दौरा कार्यक्रमाबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** महिला व बालकल्याण विभाग जिल्हा परीषद नागपूर, यांचे सन 2014-15 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करतांना महीला व बालकल्याण समितीच्या दौरा नस्तीची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महिला व बालकल्याण समितीच्या दौऱ्याकरीता तीन वेळा निविदा मागविण्यात आल्या होत्या चौथी वेळ निविदा प्रसिध्द न करताच दौऱ्यावरील खर्च मंजुर केला आहे. महाराष्ट्र शासन, उद्योग व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस/(2625)/1093/उद्योग-6 मंत्रालय, मुंबई,दिनांक 16/01/1993 अन्वये रुपये 50,000/- वरील खर्च निविदा मागवुननंतरच करण्याचे निर्देश आहे. त्यामुळे सदर खर्च नियमबाहय करण्यात आला आहे.

2) महीला व बालकल्याण समिती सदस्याचा दौरा हा जिल्हा परिषद शासन दौरा असल्यामुळे जिल्हा परिषदेने सर्व महिला सदस्याकरीता एकत्रीत बस ठरवुन किलामीटर दराने वाहन भाडयाने घेवुन दौरा करणे आवश्यक होते. परंतु तसे न करता प्रत्येक महिला सदस्याने स्वतंत्र वाहन भाडयाने घेवुन दौरा केलेला आहे. त्यामुळे सदर दौऱ्याकरीता जिल्हा परीषददेस जादा खर्च करावा लागला आहे.

3) महिला व बालकल्याण समितीच्या दौऱ्याकरीता वैयक्तीक देयके मंजुर केलेली दिसुन येते वास्तविक पाहता सदर दौऱ्याकरीता उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) यांचे नावाने अग्रीम मंजुर करुन सर्व देयके महिला व बालकल्याण (जिल्हा परिषद) विभागाचे नावाने घेणे आवश्यक होते.

4) महिला व बालकल्याण समिती सदस्याचा दौऱ्याकरीता भोजनाची व्यवस्था शुभम कॅटरर्स, नागपूर यांनी केल्याबाबत त्यांना प्रत्येकी रुपये 4,765/- असे एकुण रुपये 1,42,950/- प्रदान केले आहे. सदर खर्च निविदा मागवुन करणे आवश्यक होते. परंतु सदर खर्च नियमबाहय प्रदान केला आहे. तसेच शुभम कॅटरर्स, नागपूर यांनी केरळ राज्यामध्ये जेवन सुविधा तयार करुन देण्याकरीता गॅस व इतरर साहित्य कशाप्रकारे व कोठुन आणले याबाबत स्पष्टता होत नाही. सदर देयकातुन आयकर अधिनियम 1961 मधील कलम जे अन्वये आयकराची कपात करणे आवश्यक होते. परंतु आयकराची कपात केलेली नाही. त्यामुळे शासनाचे नुकसान झाले आहे.

**3.887 आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना (ओ.टी.एस.पी.) गटात 90% अनुदानावर ग्रामीण भागातील दारीद्रय रेषेखालील स्त्रियांना सौर कंदील पुरवठा योजना खर्चातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** प्रमाणक क्रमांक 1039 दिनांक 31/03/2015 रक्कम 179172/- जी.के. एनर्जी मार्केटर, पुणे अन्वये आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना फंड गटात 90 टक्के अनुदानावर ग्रामीण भागातील दारीद्रय रेषेखालील स्त्रियांना सौर कंदील पुरवठा योजना खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठादाराकाडून आयकर 2 टक्के रुपये 3,584/- व अधिभार 15 टक्के रुपये 538/- अशी एकुण रक्कम रुपये 4,122/- वसुल केली नाही, त्याप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.

2) पंचायत समिती स्तरावर प्रत्यक्ष साहित्य पुरवठा दिनांक 15/03/2015 ते दिनांक 18/03/2015 दरम्यान दाखविण्यात आला, परंतु पुरवठादारासोबत करारनामा त्यानंतर दिनांक 23/03/2015 ला करण्यात आला.

3) ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक - झेडपीए/2008/प्र.क्र446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये वैयक्तिक लाभाचे योजनाचे विहित केलेले वेळापत्रकाचे पालन केले नाही.

4) लाभार्थ्यींचे गावनिहाय मास्टर रजिस्टर ठेवलेले नाही. त्यामुळे लाभार्थीला दुबार लाभ दिल्याची पडताळणी करता आली नाही. मास्टर रजिस्टर ठेवणे आवश्यक आहे.

5) वाटप केलेले साहित्य लाभार्थी वापरत असल्याबाबतची खात्री करुन त्यांच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा झाल्याचा फलश्रृती अहवाल सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

6) पंचायत समिती, आष्टीने लेखापरीक्षणाकरिता अभिलेखे सादर केले नाही. त्यामुळे तपासणी करता आली नाही.

**3.888 90 टक्के अनुदानावर 7 वी ते 12 वी पास मुलींना MSCIT प्रशिक्षण योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2014 - 2015 (परिच्छेद क्रमांक 4)** - सदर योजनेतुन 7 वी ते 12 पास मुलींकरिता एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षण योजना राबविली आहे. सदर योजनेतून 199 मंजूर मुलींना लाभ देण्याकरिता रक्कम रुपये 5,99,985/- खर्च करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजना राबविण्यात येणाऱ्या वित्तीय वर्षाकरिता मर्यादित आहे. म्हणजे योजना सन 2014-2015 मध्ये राबवीत असल्यामुळे सन सन 2014-2015 या वित्तीय वर्षात 7 वी ते 12 वी पास मुलींना लाभ देणे गरजेचे असताना, सन 2014-2015 पूर्वी 10/12 वी पास सन 2014-2015 मध्ये उच्च शिक्षण अथवा शिक्षण पूर्ण केलेल्या

अप्रात्र मुली/महिलांना लाभ देण्यात आला आहे. अपात्र लाभार्थीवरील खर्च रक्कम रुपये 2,35,170/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

2) पंचायत समिती आर्वीचे 39 पैकी 19 लाभार्थीचे अर्ज, पंचायत समिती कारंजा 9 लाभार्थी अर्ज, पंचायत समिती आष्टी 14 अर्ज तपासणीकरिता अर्धसमास पत्र क्रमांक 1 दिनांक 09/12/2015 पत्र क्रमांक 2 दिनांक 10/12/2015 पत्र क्रमांक 7 दिनांक 18/12/2015नुसार मागणी करून देखील लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही.त्यामुळे सदर लाभार्थीवर करण्यात आलेला खर्च रक्कम रुपये 126630/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

3) लाभार्थीकडून प्राप्त करण्यात आलेल्या अर्जासोबत 20/- रुपये मुद्रांक शुल्काचे बंधपत्र घेण्यात आले नाही. तसेच बंधपत्रात प्रशिक्षण उत्तीर्ण होणे अनिर्वाय आहे, अन्यथा लाभाची रक्कम परत करण्यात यावे. अशी अट नमूद करण्यात आले नाही. त्यामुळे अनुउत्तीर्ण लाभार्थ्यांवर करण्यात आलेला खर्च निरर्थक ठरला असून, जिल्हा परिषद उपकर निधीचे मोठे नुकसान झाले आहे.

4) पंचायत समितीला वाटप करण्यात आलेल्या वित्तप्रेषनातून झालेल्या खर्चाचे अहवाल व अखर्चित निधी विभागाला लेखापरीक्षण कालावधी पर्यंत परत करण्यात आला नाही. याबाबत अर्धासमास पत्र क्रमांक 10 दिनांक 22/12/2015 नुसार विचारणा करण्यात आली आहे.

5) भारतीय वित्तीय अधिनियम 1994 चे कलम 66 नुसार तसेच भारत सरकार महसूल विभागाचे शासन notification No. 33/2011 दिनांक 25/04/2011 नुसार प्रशिक्षण संस्थेने सेवा कर 12.3 टक्के भरणे आवश्यक असतांना, सदर योजने अंतर्गत प्रशिक्षण संस्थेला प्रदान करण्यात आलेल्या प्रशिक्षण फी रक्कम रुपये 5,99,985/- वर सेवा कर रक्कम रुपये 73,798/- कपात करण्यात आला नाही. तरी संबंधित प्रशिक्षण संस्थेकडून सेवा कराची रक्कम वसूल करण्यात यावे. अथवा संस्थेने सेवाकर भरले असल्यास सेवा कर विभागाचे प्रमाणपत्र प्राप्त करावे.

6) पंचायत समिती वर्धा अनियमितता - अहवालासोबत जोडण्यात आलेले लाभार्थी विवरणपत्र पान क्रमांक 3 व 4 वर अपात्र लाभार्थी यादी अपात्रतेचे कारणासह जोडण्यात आली आहे.तरी अपात्र लाभार्थी संख्या 34 यांच्यावर करण्यात आलेला खर्च रक्कम रुपये 1,02,510/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

7) पंचायत समिती देवळी अनियमितता - अहवालासोबत जोडण्यात आलेले लाभार्थी विवरणपत्र पान क्रमांक 12 वर अपात्र लाभार्थी यादी अपात्रतेचे कारणासह जोडण्यात आली आहे. तरी अपात्र लाभार्थी संख्या 13 यांच्यावर करण्यात आलेला खर्च रक्कम रुपये 39,195/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

8) पंचायत समिती सेलू अनियमितता - अहवालासोबत जोडण्यात आलेले लाभार्थी विवरणपत्र पान क्रमांक 8 वर अपात्र लाभार्थी यादी अपात्रतेचे कारणासह जोडण्यात आली आहे.तरी अपात्र लाभार्थी संख्या 12 यांच्यावर करण्यात आलेला खर्च रक्कम रुपये 36,180/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

9) पंचायत समिती हिंगणघाट अनियमितता - अहवालासोबत जोडण्यात आलेले लाभार्थी विवरणपत्र पान क्रमांक 6 वर अपात्र लाभार्थी यादी अपात्रतेचे कारणासह जोडण्यात आली आहे. तरी अपात्र लाभार्थी संख्या 8 यांच्यावर करण्यात आलेला खर्च रक्कम रुपये 24,120/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

10) पंचायत समिती आर्वी अनियमितता - अहवालासोबत जोडण्यात आलेले लाभार्थी विवरणपत्र पान क्रमांक 9 वर अपात्र लाभार्थी यादी अपात्रतेचे कारणासह जोडण्यात आली आहे.तरी अपात्र लाभार्थी संख्या 8 यांच्यावर करण्यात आलेला खर्च रक्कम रुपये 24,120/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

11) पंचायत समिती समुद्रपूर अनियमितता - अहवालासोबत जोडण्यात आलेले लाभार्थी विवरणपत्र पान क्रमांक 5 वर अपात्र लाभार्थी यादी अपात्रतेचे कारणासह जोडण्यात आली आहे.तरी अपात्र लाभार्थी संख्या 3 यांच्यावर करण्यात आलेला खर्च रक्कम रुपये 9,045/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

**3.889 सेस फंड अंतर्गत सर्वसाधारण गटात 90 टक्के अनुदानावर ग्रामीण भागातील दारीद्रय रेषेखालील स्त्रियांना सौर कंदील पुरवठा योजना खर्चातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** प्रमाणक क्रमांक 247, दिनांक 31/03/2015 रक्कम रुपये 9,89,712/- जी.के. एनर्जी मार्केट, पुणे अन्वये सेस फंड अंतर्गत सर्वसाधारण यादीत 90% अनुदानावर ग्रामीण भागातील दारीद्रय रेषेखालील स्त्रियांना सौर कंदील पुरवठा योजना खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, कारंजा यांच्या सर्वसाधारण गटात 91 लाभार्थ्यांची निवड महिला व बालकल्याण विषय समितीची मासीक सभा दिनांक 09/03/2015 ठराव क्रमांक 02 अन्वये केली असतांना 93 सौर कंदीलांचा पुरवठा आदेश देण्यात आला. रक्कम (2 x 2370) = रुपये 4,740/- वसुलपात्र आहेत.

2) पंचायत समिती, वर्धा यांचे साठा पुस्तक पान क्रमांक 06 अनुक्रमांक 45 व पान क्रमांक 11 अनुक्रमांक 97 वर कल्पना राहुल कांबळे, वरुड यांना दुबार लाभ देण्यात आला. रुपये 2,370/- वसुलपात्र आहे.

3) पुरवठादाराकाइून आयकर 2% रुपये 19,795/- व अधिभार 15% रुपये 2,970/- अशी एकुण रक्कम रुपये 22,765/- वसुल केली नाही. त्याप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.

4) पंचायत समिती स्तरावर प्रत्यक्ष साहित्य पुरवठा दिनांक 15/03/2015 ते दिनांक 18/03/2015 दरम्यान दाखविण्यात आला, परंतु पुरवठादारासोबत करारनामा त्यानंतर दिनांक 23/03/2015 ला करण्यात आला.

5) ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक- झेडपीए/2008/प्र.क्र446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये वैयक्तिक लाभाचे योजनाचे विहित केलेले वेळापत्रकाचे पालन केले नाही.

6) लाभार्थ्यीचे गावनिहाय मास्टर रजिस्टर ठेवलेले नाही. त्यामुळे लाभार्थ्यीला दुबार लाभ दिल्याची पडताळणी करता आली नाही. मास्टर रजिस्टर ठेवणे आवश्यक आहे.

7) वाटप केलेले साहित्य लाभार्थी वापरत असल्याबाबतची खात्री करुन त्यांच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा झाल्याचा फलश्रृती अहवाल सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

8) पंचायत समिती, आष्टीने लेखापरीक्षणाकरिता अभिलेखे सादर केले नाही. त्यामुळे तपासणी करता आली नाही. पंचायत समिती, आष्टीचे अभिलेख्या अभावी 45 सौर कंदीलाची रक्कम रुपये 1,06,650/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

**3.890 दोन चाकी सायकल खरेदी व वाटपातील अनियमिततेबाबत**.

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5)** - सन 2014 - 2015 या आर्थिक वर्षात प्रमाणक क्रमांक 1266 दिनांक 29/12/2014 रुपये 5,99,400/- स्वस्तिक सायकल स्टोअर्स यांचे प्रदानाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, निर्णय दिनांक 22 जुलै 2011 नुसार वर्ग 5 ते 10 मध्ये शिकणा-या विदयार्थ्यांना सन 2014-2015 या वर्षातील योजनेसाठी लाभ देणे आवश्यक असतांना ठराव क्रमांक 5 दिनांक 10/02/2014 चे सभेमध्ये सन 2013-2014 या आर्थिक वर्षातील 10 व्या वर्गात शिकत असलेल्या लाभार्थ्यांची निवड करुन लाभ दिल्याचे दिसून आले. प्रत्यक्षात 2014-2015 मधील योजनेची अंमलबजावणी झाल्याने रुपये 24,300/- वसुलपात्र ठरतात.

2) साहित्याचे चाचणीचे आधीच पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

3) अट क्रमांक 8 नुसार साहित्याचा पुरवठा 45 दिवसाचे आंत केलेला नसतांना 0.05 टक्के दराने दंड आकारणी केलेली नाही.

**3.891 90 टक्के अनुदानावर सौर कंदील पुरवठा योजनेतील अनियमिततेबाबत**.

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15)** - सन 2014-2015 या वित्तीय वर्षात प्रमाणक क्रमांक 45, दिनांक 12/05/2014 रुपये 3,98,088/- मे.एग्रीन एलीड सर्व्हीस प्रायव्हेट लिमीटेड, नागपूर

यांचेकडून 194 नग सौर कंदील रुपये 2,280/- प्रति नग प्रमाणे खरेदीबाबत प्रदान करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सौर कंदीलाचा साईज व वजन पुरवठा आदेशात नमुद नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83(1) व (3) अन्वये साहित्य खरेदी नंतर प्राप्त झालेले सौर कंदिल योग्य दर्जाचे व त्रयस्थ शासनमान्य संस्थेकडून चाचणी करुन घेतल्याचे दिसून आले नाही.

3) लाभार्थी हिस्सा वसुल करण्यापुर्वी सौर कंदिल खरेदी योजना राबविली आहे.

4) लाभार्थींचे गावनिहाय मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

5) लाभार्थ्याच्या आर्थिक स्थितीचा अहवाल पर्यवेक्षीय यंत्रणेकडून घेतलेला नाही. तसेच उपयोगिता प्रमाणपत्रही घेतलेले नाही.

6) शासन निर्णय दिनांक 10 मार्च 2011 अन्वये एकुण खर्चाच्या 3 टक्के रक्कम अपंगासाठी खर्च करण्यात आलेली नाही.

7) निवडक लाभार्थ्यांचे अर्ज तपासले असता अर्जावर बाल विकास प्रकल्प अधिकारी, गोंदिया यांची स्वाक्षरी नाही. तसेच अर्जासोबत बिपीएल/ उत्पनाचे दाखले जोडलेले नाहीत.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. झेडपीए/2008//प्र.क्र. 446/ वित्त-9, दिनांक 20 जून 2008 नुसार नेमुन दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे योजना राबविलेली नाही.

**3.892 ग्रामीण भागातील दारीद्रय रेषेखालील 12 वी पास झालेल्या मुलींना उच्च शिक्षणासाठी अर्थसहाय करणेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** ग्रामीण भागातील दारीद्रय रेषेखालील 12 वी पास झालेल्या मुलींना उच्च शिक्षणासाठी अर्थसहाय्य करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास 2012/प्र.क्र.104/वित्त-3,दिनांक 16/10/2012 नुसार शासन निर्णय दिनांक 29/01/2014 च्या निकषानुसार पात्र ठरत असलेल्या विदयार्थ्यीनीची यादी महीला व बालकल्याण समितीकडुन मंजुर करुन घेतल्याबाबत नस्तीत उपलब्ध नाही.

2) शिक्षण विभाग, जिल्हा परीषद, चंद्रपूर कडुन उपलब्ध करुन देण्यात आलेली विद्यार्थ्यीनीची यादी नस्तीमध्ये उपलब्ध नाही.

3) विद्यार्थ्यीनींच्या रक्कम प्राप्तीबाबत पोच पावत्या उपलब्ध नाहीत.

4) उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही.

**3.893 गरोदर व स्तनदा मातांना प्रोटीन सिरपचा पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** जिल्हा परीषद सेस फंड अंतर्गत प्रोटीन सिरपचा पुरवठा करणेबाबत रुपये 9,99,994/- खर्च केलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेश व करारनामा अट क्रमांक 3 नुसार औषध साहीत्य दिनांक 25/03/2015 चे आत प्रकल्पस्तरावर पुरवठा केलेला नाही.

2) पुरवठा आदेश अट क्रमांक 7 नुसार शासकीय प्रयोगशाळेचा तपासणी अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

3) विनियोग व उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाही.

4) प्रकल्पस्तरावरील साठा नोंदवह्या लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने त्याबाबतची तपासणी करता आली नाही.

**3.894 MSCIT/CCC प्रशिक्षणातील(SCP) खर्चाचे प्रदानातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** विशेष घटक योजने अंतर्गत अनुसुचित जातीचे महिला व मुलींना MSCIT/CCC प्रशिक्षण देण्यासाठी एकुण रक्कम रुपये 2,71,280/-(2,51, 930+ 19,350) खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेला या विभागाकडून प्रमाणित केलेली लाभार्थ्यांची निवड यादी पुरविली जाते. ही यादी सभापती, महिला व बालकल्याण समिती व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला बाल कल्याण) यांनी प्रमाणित केलेली असते. निवड यादी नस्तीस सलग्न नाही.

2) गडचिरोली केंद्र, सी-गेट कॅम्पुटर यांनी सादर केलेल्या निवड यादीत कुमारी योगीता राजु शेंडे हिचे नाव नाही. परंतु परीक्षेला बसल्याची सादर केलेल्या यादीत सिट नंबर व रोल नंबर आहे. कु.योगीता घनश्याम बंसोड निवड यादीत नाव आहे. परंतु परीक्षेला बसल्याची सादर केलेल्या यादीत सिट नंबर व रोल नंबर नाही. म्हणजेच परिक्षेला कु.योगीता राजु शेंडे बसली व कु.योगीता घनश्याम बंसोड हिला लाभ दिला असे वाटते तरी नेमके कोणत्या लाभार्थीला प्रशिक्षण देण्यात आले आहे. याची खात्री पटवावी. अन्यथा एका लाभार्थ्यांचे अनुदान रुपये 3,050/- जादा प्रदान झालेले असून ते वसूलीस पात्र आहे.

3) कोणत्या प्रशिक्षण केंद्रावर कोणी प्रशिक्षण दिले याची यादी नस्तीला जोडलेली नाही.

4) प्रशिक्षण कालावधी 3 महिने तथा 400 तासिका होणे बंधनकारक होते. तसे तासिका निहाय उपस्थिती पत्रक तयार करुन नस्तीस जोडलेले नाही. माहेवारी उपस्थिती पत्रक जोडलेले असून 400 तासिका पूर्ण होत असल्याचे स्पष्ट होत नाही.

5) रोजगार प्राप्ती व उत्पन्नात वाढ व्हावी हा उद्देश सफल झाल्याबाबत प्रत्यक्ष पडताळणी करुन उपयोगिता प्रमाणपत्र ठेवण्यात आल्याचे दिसून आले नाही.

6) मास्टर नोंदवही ठेवली नाही. त्यामुळे दुबार लाभ घेतल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**3.895 आदिवासी उपयोजना (टि.एस.पी.) अंगणवाडी केंद्रातील लाभार्थींना अतिरिक्त आहार पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** उपयोजना (टि.एस.पी.) अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील लाभार्थ्यांना अतिरिक्त आहार पुरविणेसाठी प्रमाणक क्रमांक 2253,दिनांक 04/03/2015 अन्वये रूपये 9,99,999/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 12 प्रकल्प स्तरावरील अंगणवाडी केंद्राची मागणीपत्र नस्तीला उपलब्ध नाही. त्यामुळे माल कोणत्या आधारे मागविण्यात आला याची खात्री करता आली नाही.

2) 12 प्रकल्प स्तरावरील माल पोहच केल्याचे पोच पावत्या आहेत त्यात माल पोहच केल्याचे दिनांक 23/09/2014 शिक्का नमुद आहे. परंतु प्रकल्प स्तरावरील साठापुस्तकाची अर्धसमास पत्र क्रमांक 2,दिनांक 18/05/2016 अन्वये मागणी करूनही उपलब्ध केले नाही. त्यामुळे माल कधी पोहचला व अंगणवाडी केंद्राला कधी वाटप केला याची खात्री करता आली नाही.

3) अटी व शर्ती अट क्रमांक 4 मध्ये माल सुस्थितीत प्राप्त झाल्याचे प्रमाणपत्र C.D.P.O. प्रमाणपत्र देऊन प्रमाणित न करता उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला बाल कल्याण) जिल्हा परिषद गडचिरोलीचे प्रमाणपत्र देऊन प्रमाणित केले आहे.

4) अटी व शर्ती अट क्रमांक 10 मध्ये मालाची मुदतबाहयता 6 महिन्याची असावी असे नमुद आहे. परंतु प्रकल्प स्तरावरील साठापुस्तकाची अर्धसमास पत्र क्रमांक 2 दिनांक 18/05/2016 अन्वये मागणी करूनही उपलब्ध केले नाही. त्यामुळे माल मुदतबाहयतेनंतर अंगणवाडी केंद्राला वाटप केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

5) अटी व शर्तीनुसार अतिरिक्त आहार ग्रामीण प्रकल्पाअंतर्गत आदिवासी क्षेत्राअंतर्गत येणाऱ्या अंगणवाडी केंद्रानाच करण्यात यावा असे नमुद आहे. परंतु आदिवासी क्षेत्राअंतर्गत येणाऱ्या अंगणवाडी केंद्राची मागणीपत्र अथवा यादी नस्तीला उपलब्ध नाही. त्यामुळे याची खात्री करता आली नाही.

**3.896 जिल्हा परिषद उपकर योजनेतून 7 वी 12 वी पास मुलींना संगणक एमएस - सीआयटी (MS-CIT) प्रशिक्षणामधील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद औरंगाबादचे सन 2014-2015 हया वित्तीय वर्षात जिल्हा परिषद उपकर योजनेतून 7 वी 12 वी पास मुलींना संगणक एमएस-सीआयटी (MS-CIT) प्रशिक्षणावर रक्कम रुपये 17,38,650/- चा खर्च केलेला आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एमएस-सीआयटी हा अभ्यासक्रम उच्च व तंत्रशिक्षण खात्याचा अभ्यासक्रम असून, महाराष्ट्र शासनाने ही बाब महाराष्ट्र ज्ञान मंडळ, मुंबई यांचेकडे वर्ग केली आहे. सदरील अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्यासाठी मान्यताप्राप्त एमएस-सीआयटी ची जिल्हयामध्ये 231 अधिकृत प्रशिक्षण केंद्रे आहेत, असे असतांना सुयश कॉम्पुटर इन्स्टीटयुटला संपूर्ण जिल्हयाचे प्रशिक्षणाचे काम सोपविण्यात आले आहे ही बाब जिल्हा परिषद तसेच लोक हिताची नाही.

2) एमएस-सीआयटी प्रशिक्षणासाठी निविदा किंवा ई-टेंडरींग प्रक्रिया राबविली गेली असती तर निश्चितपणे स्पर्धात्मक दराचा लाभ जिल्हा परिषदेस झाला असता.

3) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीऐ-2013/प्र.क्र.76/परा-1,दिनांक 24/01/2014 नुसार प्रशिक्षण दिलेल्या एकूण 692 लाभार्थीपैकी 3 टक्के अपंग मुली व महिलांना लाभ दिला नसल्याचे दिसून येते.

4) एमएस-सीआयटी प्रशिक्षण दिलेल्या 692 लाभार्थीपैकी फक्त 353 उत्तीर्ण झाले 232 अनुत्तीर्ण झाले तर 107 लाभार्थी गैरहजर होते. प्रशिक्षण पूर्ण न करणा-या लाभार्थीकडून लाभाची रक्कम परत करणे बाबतचे हमीपत्र असतांना एकूण 107 लाभार्थ्यांची रक्कम रुपये 3,58,450/- रक्कम निष्फळ झाल्याचे लेखापरीक्षणात स्पष्ट झाले आहे.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 79 अन्वये देयक प्रदानानंतर विरूपीत करणे आवश्यक आहे.

**3.897 इयत्ता 5 वी ते 12 वी मुलींना सायकल वाटपातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद औरंगाबादचे सन 2014-2015 मध्ये सन 2013-2014 मधील अखर्चित निधीतून इयत्ता 5 वी ते 7 वीच्या मुलींना 322 सायकली वाटप करण्यासाठी रक्कम रुपये 8,97,221/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार विहित केलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक पीआरसी-1083/सीआर-1974/67,दिनांक 29/07/1983 अन्वये वाटप साहित्याचे विनियोग प्रमाणपत्र सादर करणे व दिनांक 20/10/1999 अन्वये लाभार्थी साहित्य वाटपा बाबत मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83 (3) अन्वये मालाचा दर्जा व गुणवत्ता बाबतचे प्रमाणपत्र संचिकेत नाही.

4) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (सी) नुसार पुरवठादार संस्थेकडून रक्कम रुपये 8,97,221/- रक्कमेवर 2 टक्के प्रमाणे आयकर रक्कम रुपये 17,944/- व 2 टक्के मुल्यवर्धित कर रक्कम रुपये 17,944/- याप्रमाणे एकूण रक्कम रुपये 35,888/- वसूल करून संबंधित लेखाशिर्षाखाली भरणा केला असल्याचे दर्शविले नाही.

**3.898 एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षण खर्चातील नियमबाह्यताबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, परभणी चे सन 2014-15 चे लेखापरीक्षण अंतर्गत 7 वी ते 12 वी पास मुलींना एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षण या योजनेमध्ये अनियमितता आढळून आल्या आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/पंरा-1,दिनांक 24/01/2014 मधील अट क्रमांक 4 अन्वये 7 वी ते 12 वी पास दारिद्र्यरेषेखालील मुलींना किवा ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये 50,000/- पर्यंत असलेल्या कुटुंबातील मुलींना प्राधान्याने संगणक प्रशिक्षण देण्यात यावे असे नमूद असताना लेखापरीक्षणात दारिद्र्यरेषेखालील यादी न दर्शविल्यामुळे लाभार्थ्याचे कुटूंबप्रमुखाचे नाव दारिद्र्य रेषेखालील यादीत आहे किंवा नाही याची तपासणी करता आली नाही. तसेच चार लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न रुपये 50,000/- पेक्षा जास्त आढळून आले. तसेच दोन लाभार्थी यांचे शैक्षणिक कागदपत्र प्रस्तावासोबत नाहीत. त्यामुळे त्यांची शैक्षणिक अट पुर्ण केल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

2) शासकीय व निमशासकीय नोकरीसाठी एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. एम.एस.सी.आय.टी./सी.सी.सी. व समकक्ष असणारे प्रशिक्षण योजना उपयुक्त देणेसाठी हि योजना उपयुक्त राहील असे शासन निर्णयात नमूद केले आहे, परंतु सदरील प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर 62 लाभार्थ्यांनी परीक्षा दिली नाही तसेच 141 लाभार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत.

3) आयकर नियम 194 (J) नुसार तांत्रिक सेवा देणाऱ्याला मिळणाऱ्या उत्पन्नावर 10 टक्के दराने आयकर कपात करणे आवश्यक होते. त्या प्रमाणे कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे संबंधीताकडून 10 टक्के आयकराची रक्कम रुपये 2,27,565/- वसूल करून आयकर खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 79 नुसार प्रत्यक्ष देण्यात आलेली पुरवठा देयक दुबार वापरली जाऊ नये म्हणून विरूपित केली पाहिजे परंतु विरूपित केलेली नाही.

**3.899 शासन 90% अनुदानावर विशेष घटक योजनेअंतर्गत अनुसूचीत जातीचे गरजु महिलांना स्वयंरोजगारासाठी पिठाची गिरणी/पल्प रायझर मशीन पुरवठ्यामधील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** महिला व बालकल्याण विभागाचे सन 2014-15 चे लेखापरीक्षण अंतर्गत पिठाची गिरणी खरेदीसाठी पुनप्रत्ययी आदेश दिले आहेत सदर योजने अंतर्गत रक्कम रूपये 18,00,000/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-1088/2512/उद्योग-6, दिनांक 02/01/1992 मधील परिशिष्ट 7 (4) अन्वये ज्या वस्तूची खरेदी मुळ आदेशापेक्षा कमी नसतील वा कमी होणार नसतील किंवा ह्या किमती स्थिर आहेत व प्रमाणीकृत आहेत याची शहानिशा करून याबाबत टिपणी संबंधीत कागदपत्रासहित सामान खरेदी समितीपुढे सादर करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) वरील शासन निर्णयातील परिशिष्ट 7(5) नुसार मुळ आदेशातील संख्या आणि किंमत यापेक्षा पुनप्रत्ययी आदेश 200 टक्क्यापर्यंत मर्यादित असावा. पुनप्रत्ययी आदेशान्वये लागणारी संख्या व तिची गरज याविषयी संबधीत सामान खरेदी समितीने खात्री करून घ्यावी असे नमूद केले आहे परंतु अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्रक-446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषदेने राबविण्याच्या वैयक्तिक लाभांच्या योजनासाठीचे वेळापत्रक पाळण्यात आलेले नाही.

4) पिठाच्या गिरणीच्या खरेदी संदर्भात 10 टक्के लाभार्थी हिस्सा भरण्यासाठी व लाभार्थी निवडीबाबतीचे प्रस्तावास विषय समिती ठराव क्रमांक 80,दिनांक 08/08/2014 अन्वये मान्यता प्रदान असताना प्रत्यक्षात लाभार्थी हिस्सा रक्कम माहे जुन-16 मध्ये भरणा केल्याचे दिसून येते. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपी-2010/अनौस क्र.33/प्र.क्र.168/421, दिनांक 20/03/2011 अन्वये लाभार्थी निवडीनंतर लाभार्थी हिस्सा रक्कम भरून खरेदी करणे आवश्यक होते परंतु खरेदीनंतर लाभार्थी हिस्सा जमा केलेला आहे.

5) एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प, गंगाखेड यांनी साठा नोंदवही विहित नमुन्यात 32 मध्ये ठेवलेली नाही व लेखापरीक्षणाच्या वेळी शिल्लक 1 नग आढळून आला आहे.

6) सदर योजनेचे उद्दिष्ट सफल झालेबाबतचा फलश्रुती अहवाल घेण्यात आलेला नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिति लेखसंहिता 1968 चे नियम 79 नुसार प्रदानानंतर उपप्रमाणके विरुपित करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झालेली नाही.

**3.900 विशेष घटक योजनेतुन गट ब अंतर्गत अंगणवाडी केंद्रांना प्लास्टिक मॅट्स पुरवठा करणे मधील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** महिला व बालकल्याण विभागाचे सन 2014-15 चे लेखापरीक्षण अंतर्गत अंगणवाडी केंद्रांना साहित्य खरेदी करणे या योजने अंतर्गत प्लॅस्टिक मॅटची खरेदी अंतर्गत रक्कम रूपये 1,97,513/- खर्च नोंदविला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंगणवाड्यांना एकूण 206 प्लास्टिक मॅटचे वाटप करण्यात आलेले आहे. परंतु यापूर्वी अशा मॅटचे कोणत्या अंगणवाड्यांना पुरवठा करण्यात आला व किती अंगणवाड्यांना आवश्यकता आहे. याबाबतची माहिती/मागणी घेण्यात आली नाही.

2) प्लास्टिक मॅटचे पुरवठा बाबत प्रत्यक्ष अंगणवाडी स्तरावरील वाटपाबबात जिंतुर, सेलू, पालम, गंगाखेड यांनी अंगणवाडी स्तरावरील साठा नोंदवही अभावी तपासणी करता आली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 79 नुसार प्रत्यक्ष देण्यात आलेली पुरवठा देयक दुबार वापरली जाऊ नये म्हणून विरूपित केली पाहिजे परंतु सदर देयके विरूपित केलेली नाही.

**3.901 नियमबाहय रित्या तांत्रिक मान्यता प्रदान करणेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** सन 2014-15 च्या लेखापरीक्षणात महिला व बालकल्याण विभागाने पंचायत समित्यांच्या योजना राबवितांना दिलेल्या तांत्रिक मान्यतांच्या नस्तीची मागणी करता सदर नस्ती / आदेशाची कार्यालयीन प्रत विभागाकडुन उपलब्ध न झाल्याने सर्व पंचायत संमित्यांच्या अहवालांचे अवलोकन केले असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 नुसार विभागाने पंचायत समिती हिंगोलीला पी.व्ही.सी. पाईप खरेदीसाठी दिलेली तांत्रिक मान्यता शासन निर्णयानुसार नसुन शासन निर्णयात नमुद वस्तू व्यतिरिक्त इतर वस्तू खरेदीसाठी नियमबाहय तांत्रिक मान्यता प्रदान केल्याने पंचायत समिती स्तरावर रुपये 9,79,633/- ची चुकीची योजना राबविली गेली आणि केलेला खर्च निष्फळ तथा नियमबाह्य झाला.

2) उपरोक्त नमुद शासन निर्णयानुसार गट अ च्या प्रशिक्षण व सक्षमीकरणाच्या योजनांसाठी समितीच्या एकुण निधीपैकी 50 टक्के आणि वस्तु खरेदीच्या योजनांसाठी 50 टक्के निधी खर्च करण्याचे शासन आदेश असतांना संपुर्ण योजना 100 टक्के वस्तुखरेदीवर राबविली असुन याबाबत तांत्रिक मान्यतेमध्ये स्पष्ट आदेश असणे आवश्यक असताना तांत्रिक मान्यतेमध्ये स्पष्ट उल्लेख न केल्याने पंचायत समिती हिंगोली आणि पंचायत समिती औंढा यांनी उपलब्ध तरतुद रुपये 9,80,000/- आणि रुपये 5,40,000/- ठेवुन अनुक्रमे रुपये 9,79,633/- आणि रुपये 5,13,700/- चा 100 टक्के खर्च केवळ गट ब च्या योजना म्हणजेच वस्तुखरेदीवर करुन शासन आदेशाचे पालन केले नाही.

3) सदरबाबत विभागाने दिलेली तांत्रिक मान्यता नियमबाहय व शासन निर्णयाविरुध्द असल्याने याबाबत शासनाचे क्षमापन आवश्यक आहे.

**3.902 महिला समुपदेशन केंद्र चालविणेबाबत. (जिल्हा परिषद उपकर)**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** जिल्हा परिषद उपकरातून महिला समुपदेशन केंद्र चालविणे योजनेवर महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली कडुन नमुद प्रमाणकान्वये रूपये 2,88,000/- चा खर्च नोंदविण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, राज्य महिला आयोग, मुंबई यांचे पत्र क्रमांक म.मा.आ./स.मु.के./2034,दिनांक 22/11/2007 नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडुन सेनगाव तालुक्यासाठी महिला समुपदेशन केंद्राची नियुक्ती करण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2010/अनौसक्त 33/ प्र.क्र. 168/ पं.रा. 1, दिनांक 10/03/2011 नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सर्व तालुका स्तरावरील समुपदेशन केंद्राच्या कामाचा आढावा नियमित घेवून समुपदेशकांना सल्लागारांना मिळणारे मानधन व कार्यालयीन आवश्यक सुविधा मिळतात किंवा नाही अहवाल संचिकेत नाही.

3) ग्रामीण भागातील महिलांचे तक्रारी अर्ज किती प्राप्त झाले व त्याचा निपटारा किती करण्यात आला याचा तपशिल देण्यात आले नाही. प्रकरणे कसे निकाली काढले याची शहानिशा केलेचे बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे अहवाल नाही.

4) दारिद्र्य रेषेखालील महिलांना कायदेविषयक सल्ला व त्यांचे कौटुंबिक प्रकरणे निपटारा करण्यासाठी प्राधान्य दिलेले नाही.

5) सदरील संस्थांना मानधन देताना दरमहा किती प्रकरणे निकाली काढणे बंधनकारक आहे याबाबतचा तपशिल योजनेच्या प्रारुप अहवालामध्ये नमुद करण्यात आला नाही.

6) सदरील केंद्र चालु असल्याबाबत वेळोवेळी तालुका स्तरावरील अधिकारी व खातेप्रमुख यांनी भेटी दिल्याबाबतचा तपशिल व आढळुन आलेल्या तक्रारीबाबत पाहणी अहवाल संचिकेत दिसुन आला नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पी.आर.सी.1089/646/266/34,दिनांक 29/07/1983 नुसार फलश्रुती अहवाल व योजनेचे मुल्यमापन करण्यात आल्याचे अभिलेखे संचिकेत नाहीत.

8) तालुका स्तरावरील समुपदेशन केंद्रांना रक्कमा प्राप्त झाल्याबाबत संस्थेच्या जमा व खर्चाचे वार्षिक विवरणपत्र सनदी लेखापाल यांचेकडून प्राप्त करुन घेण्यात आलेले नाही.

**3.903 विशेष घटक योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील मुलींना संगणक एमएस-सीआयटी प्रशिक्षण देणे खर्चातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद हिंगोलीने सन 2014-15 चे लेखापरीक्षणात ग्रामीण भागातील मुलींना संगणक एम.एस. सी.आय.टी. प्रशिक्षण देण्यासाठी रूपये 7,21,338/- खर्च नोंदवला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2010/प्र.क्र.168/ पंरा-1, दिनांक 10/03/2011 व शुध्दीपत्रक दिनांक 22/07/2011 गट अ मुद्दा क्र. 05 अन्वये 10वी, 12वी पास लाभार्थी एम.एस. सी.आय.टी. अभ्यासक्रम गट वर्षात पुर्ण करणा-या लाभार्थ्यांना चालु वर्षात योजनेचा लाभ घेता येणार नाही. परंतु लेखापरीक्षणास लाभार्थ्यांचे एम.एस. सी.आय.टी. अभ्यासक्रमासाठी प्रवेशाची पावती दर्शवली असुन प्रत्यक्ष एम.एस. सी.आय.टी. पास झाल्याबाबतचे प्रमाणपत्रे दर्शवली नाहीत.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/पंरा-1,दिनांक 24/01/2014 मधील बाब क्रमांक 04 प्रमाणे संस्थेस लाभार्थ्याच्या परीक्षा व प्रशिक्षण शुल्क फी करीता लागणारी रक्कम प्रथम हप्ता म्हणुन देण्यात येईल व उर्वरीत रक्कम संबंधीत संस्थेने लाभार्थ्याचे उपस्थीती पट, लाभार्थ्याने परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्रे सादर केल्यानंतर तसेच अनुत्तीर्ण लाभार्थ्याना पुनश्च परीक्षेला बसविण्याबाबत चे हमीपत्र रूपये 100 चे मुद्रांक शुल्कावर दिल्यानंतर उर्वरीत रक्कम अदा करण्यात येईल असे असतांना देखील लाभार्थी परीक्षा उत्तीर्णतेचे प्रमाणपत्रे, तथा अनुर्तीर्ण विदयार्थी यांना पुन:श्च परीक्षेस बसविल्याबाबतचे कोणतेच अभिलेखे उपलब्ध संचिकेत ठेवलेले नाहीत. त्यामुळे योजना सफल झाली असे म्हणता येत नाही.

3) सदर योजना राबविणे मार्गदर्शक सुचना मधील अट क्र. 4 अन्वये संबंधीत संस्थेने रूपये 100/- चे मुंद्राक पेपरवर प्रशिक्षण कामी शासन नियमानुसार जिल्हा परीषदेस मुद्रांकित करारनामा करणे आवश्यक असतांना प्रशिक्षण देणा-या एकुण 55 संस्थांनी तशी कार्यवाही केली नाही.

**3.904 90 टक्के अनुदानानावर शिलाई मशिन खरेदीतील नियमबाहयता.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** सन 2014-2015 या कालावधीचे महिला बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद नांदेडचे लेखापरिक्षणात रूपये 32,96,800/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) समाजकल्याण विभाग व महिला बालकल्याण विभाग यांना आवश्यक असणा-या मशीनसाठी एकत्रित निविदा प्रकीया केली असती तर मशीनच्या संख्येचा विचार होऊन पुरवठादारात स्पर्धा निर्माण होऊन कमी दराची निविदा प्राप्त होऊन आर्थिक फायदा झाला असता परंतू महिला व बालकल्याण विभाग जिल्हा परिषद नांदेडने अशी कार्यवाही केली नाही.

2) मे. पी. व्ही. कोटगीरे जुना मोंढा नांदेड यांना पुरवठा आदेश देण्यात आले. पुरवठा आदेशानुसार शिलाई मशीनचा पुरवठा दिनांक 08/02/2015 पर्यंत करणे आवश्यक होते. परंतू विहित मुदतीत शिलाई मशीनचा पुरवठा करण्यात आलेला नाही.

3) शिलाई मशीन पुरवठा आदेशात नमुद केल्याप्रमाणे शिलाई मशीन पुरवठा विहीत मुदतीत न केल्याचे पुरवठा आदेश रद्द करुन नवीन दर करारातील उत्पादक / पुरवठादाराकडून खरेदी केल्याने जास्त दराने खरेदी करावी लागली. त्यामुळे आर्थिक नुकसार झाले.

4) जिल्हा परिषद उपकर योजनेचे लाभार्थी हिस्साची रक्कम चलनाने बँकेंत भरणा केली नाही.

**3.905 अंगणवाडयांना लहान मुलांसाठी फोल्डर टेबल व खुर्ची पुरवठा करणेमधील अनियमितता.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबादने फोल्डर टेबल व खुर्ची पुरवठा करणेबाबत रक्कम रुपये 7,96,800/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बालविकास प्रकल्प कार्यालयांना एकूण 320 नग लहान मुलांसाठी फोल्डर टेबल व खुर्ची वाटप करण्यात आलेल्या आहेत. बालविकास प्रकल्प कार्यालयांनी त्यांच्या अंतर्गत बीटना साहित्य वाटप केलेले आहे. सदरील साहित्य अंगणवाडयांना वाटप झाल्याचे अभिलेखे दर्शविणे आवश्यक आहे.

2) अंगणवाडयांमध्ये किती विद्यार्थी संख्या आहे त्याप्रमाणात किती अंगणवाडयांना टेबल व खुर्चीची आवश्यकता होती याबाबतची मागणी न घेताच खरेदी करण्यात आलेली आहे.

3) अंगणवाडी स्तरावरील साठा नोंदवही पडताळणीसाठी उपलब्ध झालेल्या नसल्यामुळे खरेदी करण्यात आलेले साहित्य योग्य अंगणवाडयांना वाटप झाल्याची खात्री पटत नाही. साठा नोंदवहीसह एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे स्वाक्षरीसह पुर्तता दर्शविणे आवश्यक आहे.